


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १७५ * नांदेड * शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# शहकाटशहाचे राजकारण: जिल्हा बँक निवडणुकीत आमदार चिखलीकर यांचा उमेदवारी अर्ज बाद

## गोविंदराव शिंदे नागेलीकर यांचाही अर्ज अवैध



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी २५५ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यानंतर दिग्गज नेत्यांसह अन्य काही जणांच्या अर्जावर आक्षेप घेण्यात आले होते. दि. १ जुलै रोजी रात्री उशिरापर्यंत झालेल्या छाननी आणि सुनावनीअंती अर्ज अवैध ठरल्याने काही दिग्गज नेत्यांना फटका बसला आहे. यात लोहा-कंधारचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर आणि खा. अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक भाजपचे गोविंदराव शिंदे नागेलीकर यांचा समावेश आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २३ जागांसाठी निवडणूक होत आहे. जिल्ह्यातील सहकाराचे राजकारण आपल्या हातात घेण्यासाठी महायुतीमधील दिग्गज नेते भाजप खा. अशोकराव चव्हाण, राष्ट्रवादीचे आ. प्रताप पाटील चिखलीकर, माजी मंत्री भास्करराव खतगावकर, काँग्रेसचे खा. रवींद्र चव्हाण आणि टिम सरसावली आहे. यात काहींनी स्वतः तर काहींनी आपल्या समर्थकांना मैदानात उतरविले आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शेवटच्या दिवशी ३० जूनपर्यंत २५५ जणांनी आपले अर्ज दाखल केले होते. यात प्रमुख नेत्यांमध्ये खा. रवींद्र चव्हाण, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. राजेश पवार, माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, माजी आ. मोहन हंबर्डे, कृष्णा पाटील आष्टीकर, कैलास गोरठेकर, शिवराज पाटील होटाळकर, प्रणिता देवरे-चिखलीकर, मीनल खतगावकर, पूनम पवार, भगवानराव पाटील आलेगावकर, संगीता पाटील डक, गोविंद पाटील नागेलीकर, लक्ष्मण ठक्करवाड, श्रावण भिलवंडे आदींनी अर्ज दाखल केला आहे. या अर्जांची छाननी दि. १ जुलै रोजी रात्री उशिरा झाली. यात काही नेत्यांच्या अर्जावर नव्या सहकार कायद्यानुसार ज्या संचालकांनी १० वर्ष पुर्ण केली, अशांचे अर्ज अवैध ठरवण्यात आले. याचा फटका आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, गोविंदराव शिंदे नागेलीकरांसह नेत्यांना फटका बसला आहे.

### न्यायालयात दाद मागणार

नागेलीकर यांनी याबाबत आपण न्यायालयात दाद मागणार आहोत असे सांगितले. सुनावणी आणि छाननी, यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी वैध, अवैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली आहे. यातील २५५ पैकी १६९ जणांचे वैध तर ८६ जणांचे अर्ज अवैध ठरल्याचे दिसून येत आहे. तर अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया १६ जुलै रोजी होणार आहे. यानंतर अंतिम उमेदवारांची यादी जाहीर झाल्यावरच जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. २८ जुलै रोजी मतदान पार पडणार आहे.

# महापालिकेचा कुठलाही करवाढ नसलेला अर्थसंकल्प मंजूर

## सर्व नगरसेवकांना ५० लाखांचा स्वेच्छा निधी –महापौर कविता मुळे




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा गुरूवारी पार पडली. या सभेत कुठलाही करवाढ नससेला अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला आहे.

महापालिकेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा दि. २ जुलै रोजी दुपारी चार वाजता कै. शंकरराव चव्हाण सभागृहात महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी उपमहापौर दीपकसिंह रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, नगरसचिव अजितपालसिंघ संधू उपस्थित होते. या सर्वसाधारण सभेत विरोधी बाकावरील काँग्रेस, एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीच्या सदस्यांनी विकासाच्या प्रश्नावर घोषणाबाजी केल्याने सभागृहात गदारोळ निर्माण झाला. परंतु महापालिकेच्या सर्व नगरसेवकांना ५० लाख रुपयांचा निधी जाहीर करताच सर्व सभागृहाने महापौर कविता मुळे यांचे आभार मानले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत स्थायी समितीने दाखल केलेला अर्थसंकल्प त्यात नगरसेवकांच्या सूचना व हरकती लक्षात घेऊन सर्वसाधारण सभेकडे देण्यात आला होता. मागील दोन वेळेस रद्द झालेली सभा गुरुवारी घेण्यात आली. सभेच्या सुरुवातीलाच सभागृह नेते महेश कनकदंडे यांनी नांदेड महापालिकेतील विकास कामाबाबत नाराजी व्यक्त करत उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी महापालिकेने ठोस पावले उचलावीत. गुंठेवारी, बांधकाम परवानगी हे भ्रष्टाचाराचे कुरण होऊ नये, याचीही काळजी घ्यावी असाही सल्ला त्यांनी सभागृहाला दिला. मालमत्ता कर मोठ्या प्रमाणात थकीत असल्याने वसुली का होत नाही यासाठी टास्क फोर्सची निर्मिती करावी असे त्यांनी सांगितले. मालमत्ता आणि यासोबतच पाणी कर प्रलंबित आहेत वसूल करण्याची जबाबदारी कोण घेणार यासाठीही विशेष पथक स्थापन करून महापालिकेचे उत्पन्न वाढवावे असेही ते म्हणाले. लहान-मोठ्या व्यापाऱ्यांना महानगरपालिकेकडून परवाना देण्यात यावा जेणेकरून शहरांमध्ये किती व्यापारी राहतात व त्यांना सन्मानाने कसे जगता येईल यासाठीही महापालिकेने पावले उचलावी असे त्यांनी सांगितले. अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा मलनिस्सारण योजना सुरू असताना फक्त ५० ते ५५ टक्के कामे झाली. आजही नांदेडकरांना वेळेवर पाणी मिळत नाही, सेवा सुविधा देणे हे महापालिकेचे आद्य कर्तव्य आहे, असाही त्यांनी टोला लगावला. यानंतर यासोबतच विकास कामासाठी महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांना ६० लाख रुपये निधी देण्यात यावा जेणेकरून त्या नगरसेवकाला चार वर्षाचा बॅकलॉग भरून काढता येईल अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी प्रत्येक नगरसेवकाला ५० लाख रुपये निधी देण्याचे जाहीर करून पहिल्या टप्प्यात तीस लाखापर्यंतची कामे तात्काळ हाती घेण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा असेही त्यांनी सांगितले. वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले यांनी महापालिका आयुक्त यांच्यावर सडकून टीका करीत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.

एमआयएमचे नासेर यांनी शहर वाहतुकीचा विषय पुढे करत जुन्या नांदेड शहरात कुठे सिग्नल बसविण्याची गरज का नाही दिसली असा प्रश्न उपस्थित करून वाजेगाव बंधाऱ्याचे गेट टाकल्यास नांदेड शहरातील पाण्याचा स्तर उंचावेल यासाठी येणाऱ्या बजेटमध्ये निधी टाकावा अशी सूचना केली. विरोधी पक्षनेते मसूद खान यांनी शहरातील रस्त्यांबाबत दुरुस्तीची मागणी केली. काँग्रेसचे अब्दुल गफार यांनी अर्थसंकल्पीय पुस्तकांमध्ये पहिले नगराध्यक्ष शंकरराव चव्हाण यांचा फोटो वापरावा यासोबतच नवीन नगरसेवकांचीही फोटो वापरावेत यापूर्वी ते वापरले जात होते. मालमत्ते संदर्भात किंवा बांधकामाला कुठलाही कर वाढवू नका. देगलूर नाका भागातील बंजारा होस्टेल परिसराचा विकास करून त्या ठिकाणी महापालिकेला उत्पन्न मिळू शकते असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला.

# विजेच्या शॉक लागल्याने शेतमजुरासह बैलाचा मृत्यू; उमरी तालुक्यातील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यातील निमटेक शिवारात सोयाबीनची पेरणी करत असताना एका शेतमजुराचा धक्का वीज पुरवठा करणाऱ्या खांबाच्या तणावाला लागल्याने त्याच्यासह एका बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना दि. २ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास घडली.

उमरी तालुक्यातील निमटेक येथील लक्ष्मण चंदापुरे यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून शेख असलम जलाल साब हा पेरणी करण्यासाठी गेला होता. पेरणी करत असताना विद्युत प्रवाह उतरलेल्या खांबाच्या तणावाला त्याची तिफन अडकली आणि या तणावाच्या तारामध्ये विद्युत पुरवठा उतरल्यामुळे शेख असलमसह एका बैलाला जोराचा विद्युत शॉक लागला. यात या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणाची माहिती निमटेक गावात समजताच सर्वांनी धावाधाव केली. उमरी पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. महावितरणच्या या गलथान कारभाराचा बळी असल्याचा संताप नागरिकांमधून ऐकावयास मिळत होता. या प्रकरणी उमरी ठाण्यात गुन्हा नोंद प्रक्रिया सुरू होती.

# सीईओ महेश पाटील रूजू; विविध विभागांना दिल्या भेटी



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार तसेच संबंधित विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, लेखा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, शिक्षण विभाग आदी विभागांना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली.

### खातेप्रमुखांच्याही कामकाजाचा घेतला आढावा

महेश पाटील यांनी सीईआपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व खातेप्रमुखांची बैठक घेऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शासनाच्या लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविणे, विकासकामांना गती देणे, तसेच नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिल्या.

# ५० किलो पॉपीस्ट्रॉ पावडर, चारचाकी-दुचाकीसह १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त; एलसीबीची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई केली. यामध्ये ५० किलो ६३० ग्रॅम पॉपीस्ट्रॉ (बोंडे तुकडे) अमली पदार्थ जप्त केला असून, एक चार चाकी व एक दुचाकी असा एकूण १५ लाख ९ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावेळी एका महिलेसह दोघांना अटक केली आहे.

दि. ३० जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास माहिती की, गुजरात राज्यातील नोंदणी क्रमांक (जीजे-१०-सीएन-३०७०) असलेल्या क्रिएटा कारमधून अंमली पदार्थ विक्रीसाठी नांदेड येथे आणण्यात येत आहेत. प्राप्त माहितीच्या आधारे पथकाने पंचांसह साईबाबा मंदिर परिसर, जुना कौठा येथे सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली.

तपासणी दरम्यान वाहनामध्ये अमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वाहनातील दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यात प्रितसिंघ रामसिंघ पुजारी (वय २३ वर्षे रा. गुरुद्वारा गेट क्र. ४, नांदेड) आणि शामला चिंतामणी पोहरे (वय ४५ वर्षे रा. चिखलवाडी, गुरुद्वारा गेट क्र. २, नांदेड) यांचा समावेश आहे. पोलिसांनी केलेल्या झडतीमध्ये वाहनातून ५० किलो ६३० ग्रॅम वजनाचे पॉपीस्ट्रॉ (अफू बोंडे तुकडे) जप्त करण्यात आले. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली इर्टिगा कार व एक दुचाकी (एमएच-२६-बीएस-२००६) जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १५ लाख ९ हजार ४५० रुपये इतकी आहे. ताब्यातील आरोपींना व जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई सपोनि विठल घोगरे, अंमलदार सुनील गटलेवार, शितल सांळुके, राजीव बोधगीरे, साहेबराव कदम, गणेश यादव व गोविंद राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# खा. श्रीकांत शिंदे यांच्या दौऱ्यानंतर शिवसेना आणि ठाकरे गटाचे एकमेकांना 'चॅलेंज'

- हिम्मत असेल तर अडवून दाखवा -खा. नागेश पाटील आष्टीकर
- वाय प्लस सुरक्षा बाजूला ठेवा, मग दौरा करा -जिल्हाप्रमुख खराटे





**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेनेचे नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे किनवट-माहुर विधानसभा दौरा करून गेल्यानंतर शिवसेना आणि ठाकरे गट एकमेकांना 'चॅलेंज' करत असताना दिसून येत आहेत. यामध्ये खा. नागेश पाटील आष्टीकर व शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांच्यात शाब्दीक चकमक सुरू आहे.

दोन्ही शिवसेनेमधील पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या दौऱ्यादरम्यान ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांच्या नेतृत्वात डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याला अडविण्याचा प्रयत्न करण्यात आला तसेच काळे झेंडे दाखवत निषेध नोंदविण्यात आला.

या घटनेनंतर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट प्रतिक्रिया देत विरोधकांना खुले आव्हान दिले. कोण किती पाण्यात आहे, हे मला चांगले माहिती आहे. आम्ही विकासाच्या मुद्यावर पक्षप्रवेश केला आहे, अशी विरोधकांची कानटोचणी केली. येत्या दहा ते बारा दिवसांत किनवट-माहुर मतदारसंघाचा दौरा करून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढणार आहोत. हिंमत असेल तर त्यावेळी अडवून दाखवा, असा इशारा विरोधकांना त्यांनी दिला. खा.आष्टीकर यांच्या या विधानाला प्रत्युत्तर देताना ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांनीही आक्रमक भूमिका घेत आमचे पोलिसांशी वैर नाही. प्रथम तुमची वाय प्लस सुरक्षा बाजूला करा आणि मग किनवट माहुर मतदारसंघात दौरा करा, असे थेट प्रत्युत्तर दिले आहे.

या शाब्दिक संघर्षामुळे किनवट-माहुर मतदारसंघात राजकीय वातावरण आणखी तापले असून आगामी काळात होणाऱ्या दौऱ्यांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत आहे.

खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याला अडवून काळे झेंडे दाखवणाऱ्या शिवसैनिकांच्या पाठीवर थाप देण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी थेट खराटे यांच्याशी फोनवर बातचीत केली. तुमच्या सारखे निष्ठावंत शिवसैनिक असल्याने शिवसेनेस धोका नाही, अशा शब्दांत शिवसैनिकांचे मनोबल वाढविले आणि पुढचा दौरा हा किनवट विधानसभेत राहिल असेही त्यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले.




## विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम २०२६

# जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्वत: गणनापत्र भरून केली मोहिमेची पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतातील लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम सुरू झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदाराचे गणनापत्र भरुन घेण्याची प्रक्रिया ३० जूनपासून आहे. या मोहिमेच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेड येथील कौठा व विष्णुपूरी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी स्वतः मतदारांचे गणनापत्र (एन्युमरेशन फॉर्म) भरुन पवर ऑनलाईन सादर केले.

यावेळी त्यांनी सर्व नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना अचूक माहिती देऊन या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले.

३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील २७ लाख ७७ हजार ७३ एवढया मतदारांची घराघरांत जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. यासाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), ३१० बीएलओ पर्यवेक्षक, ९ मतदार नोंदणी अधिकारी आणि ९० सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.


### विशेष पुनरीक्षणाचे वेळापत्रक

- ३० जून ते २९ जुलै २०२६ घराघरांत जाऊन माहिती संकलन व पडताळणी
- ५ ऑगस्ट २०२६ प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध
- ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ दावे व हरकती स्वीकारणे
- ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६ दावे-हरकतींची सुनावणी व निकाली काढणे
- ७ ऑक्टोबर २०२६ अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आवाहन

अचूक मतदार यादी ही सक्षम लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र मतदाराची योग्य नोंद होणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक ती अचूक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्या आणि विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य करा.

**३२ वे पुण्यस्मरण**



**कै. भानुदासराव गोविंदराव पाटील केंद्रे उमरगेकर**
यांच्या ३२ व्या पुण्यस्मरणानिमित्त
**विनम्र अभिवादन**

:: अभिवादनकर्ते ::

-: मुख्याध्यापक :-
**श्री. देशमुख व्ही.ए.**
श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय गोलेगाव (प.कं.)

-: सचिव :-
**बाबुराव भानुदासराव पाटील केंद्रे**
रामकृष्ण महाराज केंद्रे एज्युकेशन सो. कंधार

सर्वश्री श्री. सावंत ए.बी., श्री. केंद्रे जी.आर, फुलवळकर बी.जी, श्री. केंद्रे बी.व्ही., सौ. वडजे एस.एच., श्री. भायेगावे एम.डी., श्री. जायेभाये एस.व्ही., श्री. कदम एन.आर., गुट्टे एस.एस., सौ. चव्हाण आय.एच., श्री. शेंडगे पी.यू., श्री. केंद्रे वाय.व्ही., श्री. वाघमारे आर.बी., श्री. फुगनर व्ही.पी.

प्रकाशक :- संत ज्ञानेश्वर विद्यालय गोलेगाव (प.कं.) ता. लोहा, जि. नांदेड

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ट्रम्प यांना जोर का झटका!

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने जन्माच्या आधारावर मिळणारे नागरिकत्व रद्द करण्याचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रयत्न फेटाळून लावत अमेरिकन राज्यघटनेचे श्रेष्ठत्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. पाच विरुद्ध चार अशा बहुमताने दिलेला हा निकाल केवळ एका कायद्याचा निर्णय नाही, तर लोकशाहीतील घटनात्मक मूल्ये आणि सत्तेच्या मर्यादा यांची स्पष्ट आठवण करून देणारा आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेतील १४ वी घटनादुरुस्ती १८६८ मध्ये करण्यात आली. गुलामगिरीतून मुक्त झालेल्या नागरिकांना समान अधिकार आणि नागरिकत्त्वाची हमी देण्यासाठी ही दुरुस्ती अस्तित्त्वात आली. अमेरिकेत जन्मलेली प्रत्येक व्यक्ती अमेरिकेची नागरिक असेल, हा तिचा मूलभूत गाभा आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या कार्यकारी आदेशाद्वारे हुकूमशाही करत या तरतुदीला बाजूला सारण्याचा प्रयत्न केला. विशेषतः बेकायदा स्थलांतरित आणि तात्पुरत्या व्हिसावर असलेल्या पालकांच्या मुलांना नागरिकत्त्व नाकारण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश घटनाबाह्य ठरवत तो रद्द केला. मुख्य न्यायाधीश जॉन जी. रॉबर्ट्स यांनी दिलेल्या निरीक्षणात घटनात्मक वचन आजही कायम आहे असे स्पष्ट सांगितले. यामध्ये न्यायव्यवस्थेने सत्तेपेक्षा संविधान मोठे असल्याचा संदेश दिला आहे. लोकशाहीत कोणताही नेता, तो कितीही लोकप्रिय असो, राज्यघटनेपेक्षा मोठा असू शकत नाही. अमेरिकेतील न्यायव्यवस्थेने ही परंपरा पुन्हा एकदा जपली. डोनाल्ड ट्रम्प यांचे अविवेकी आणि बिनबुडाचे राजकारण गेल्या काही वर्षांत स्थलांतरविरोधी भूमिकेभोवती फिरत आले आहे. अमेरिका प्रथम या तर्कहीन घोषणेच्या नावाखाली त्यांनी स्थलांतरितांविरोधात कठोर भूमिका घेतली. भिंत उभारण्यापासून ते नागरिकत्त्वाच्या अधिकारावर मर्यादा आणण्यापर्यंत अनेक निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या आंधळ्या आणि स्वार्थी समर्थकांना हे धोरण आकर्षक वाटत असले, तरी संविधानाशी संघर्ष करणारे निर्णय अखेर न्यायालयात टिकू शकले नाहीत. या निर्णयाचा सर्वात महत्त्वाचा राजकीय परिणाम म्हणजे ट्रम्प यांच्या प्रतिमेला बसलेला धक्का. दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर आपल्या राजकीय अजेंड्याची आक्रमक अंमलबजावणी करण्याचा त्यांचा प्रयत्न न्यायालयाने रोखला आहे. त्यामुळे अमेरिकन राजकारणात ट्रम्प यांची राजकीय घसरण होत असल्याचे संकेत या निर्णयातून स्पष्ट दिसतात. लोकप्रियतेपेक्षा घटनात्मक मूल्यांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचत आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे, या निकालामुळे अमेरिकेतील लाखो स्थलांतरित कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. पालकांचा दर्जा काहीही असो, अमेरिकेत जन्मलेले मूल अमेरिकेचे नागरिक राहील, हा विश्वास कायम राहिला आहे. मानवी हक्क, समानता आणि सामाजिक न्याय या लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना न्यायालयाने संरक्षण दिले आहे. आज जगभर अनेक देशांमध्ये राष्ट्रवाद, स्थलांतरविरोध आणि बहुसंख्याकवादाच्या राजकारणाला चालना मिळत आहे. अशा काळात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय लोकशाही व्यवस्थांसाठी दिशादर्शक ठरतो. न्यायालये केवळ कायद्याचा अर्थ लावत नाहीत, तर संविधानातील मूल्यांचे संरक्षण करणारी अंतिम संस्था म्हणूनही उभी राहतात. भारतातही या निर्णयातून शिकण्यासारखे बरेच काही आहे. कोणतेही सरकार बहुमताच्या जोरावर घटनात्मक अधिकारांवर गदा आणू शकत नाही. न्यायपालिका स्वतंत्र आणि सक्षम असेल, तर लोकशाही अधिक मजबूत राहते. सत्तेचे केंद्रीकरण आणि घटनात्मक संस्थांचा आदर यातील संतुलन राखणे ही प्रत्येक लोकशाहीची गरज आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा केवळ नागरिकत्वाच्या प्रश्नावरील निर्णय नाही; तो संविधान, न्यायव्यवस्था आणि लोकशाही मूल्यांच्या विजयाचा दस्तऐवज आहे. तसेच लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या नेत्यालाही संविधानाच्या चौकटीतच काम करावे लागते, हे त्यातून अधोरेखित झाले आहे. ट्रम्प यांच्या राजकीय भूमिकेला हा मोठा धक्का असून, त्यांच्या प्रभावात आणि राजकीय वर्चस्वात घसरण होत असल्याचे संकेतही या प्रकरणाने दिले आहेत. लोकशाहीची खरी ताकद व्यक्तीमध्ये नसून संविधानात असते, हेच या ऐतिहासिक निर्णयाने पुन्हा सिद्ध केले आहे.

# अंतराळ कचऱ्याचे वाढते संकट : पृथ्वीच्या भवितव्याला नवे आव्हान



एकेकाळी मानवाने अंतराळाकडे प्रगती, संशोधन आणि भविष्याच्या आशेने पाहिले होते. आज मात्र त्याच अंतराळात मानवाने निर्माण केलेला 'अंतराळ कचरा' (Space Debris) ही गंभीर जागतिक समस्या बनली आहे. उपग्रह, रॉकेटचे तुकडे, वापरातून बाद झालेली याने आणि त्यांच्या धडकांमधून निर्माण झालेले लाखो तुकडे पृथ्वीभोवती वेगाने फिरत आहेत. हा कचरा आता केवळ वैज्ञानिकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. उपग्रहांवर अवलंबून असलेली दळणवळण, इंटरनेट, हवामान अंदाज, जीपीएस, बँकिंग, संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या अत्यावश्यक सेवा या धोक्याच्या छायेत आल्या आहेत.

सध्या पृथ्वीच्या कक्षेत १० सेंटीमीटरपेक्षा मोठ्या आकाराच्या सुमारे ३६ हजार निष्प्रयोज्य वस्तू फिरत आहेत. याशिवाय, एक ते दहा सेंटीमीटर आकाराचे लाखो तुकडे आणि त्याहूनही लहान कोट्यवधी कण अंतराळात विखुरलेले आहेत. या सर्व कचऱ्याचे एकत्रित वजन सुमारे १३,४८६ टन असल्याचा अंदाज आहे. या कचऱ्याचा सर्वात मोठा हिस्सा अमेरिका, रशिया आणि चीन या देशांच्या अंतराळ मोहिमांमधून निर्माण झाला आहे. गेल्या काही दशकांत झालेल्या हजारो प्रक्षेपणांमुळे आणि अनेक निष्क्रिय उपग्रहांमुळे ही समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे.

अंतराळातील हा कचरा पृथ्वीच्या खालच्या कक्षेत सरासरी सात किलोमीटर प्रति सेकंद म्हणजेच सुमारे २५ ते २८ हजार किलोमीटर प्रति तास या वेगाने फिरतो. या वेगाने एखादा छोटासा धातूचा तुकडा कार्यरत उपग्रहावर आदळला तरी त्याचे मोठे नुकसान होऊ शकते. मोठ्या तुकड्याची धडक तर संपूर्ण उपग्रहाचा चुराडा करू शकते. धडक झाल्यानंतर निर्माण होणारे हजारो नवीन तुकडे पुन्हा इतर उपग्रहांना धडकतात आणि कचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढते. त्यामुळे भविष्यात सुरक्षित अंतराळ मोहिमा राबविणे अधिक कठीण होणार आहे.

आज पृथ्वीभोवती १५ हजारांहून अधिक उपग्रह परिभ्रमण करत आहेत. यापैकी जवळपास १० हजार उपग्रह स्पेसएक्सच्या स्टारलिंक प्रकल्पाचे आहेत. जगभरात इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ही उपग्रहांची विशाल साखळी उभारण्यात आली आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे भविष्यात आणखी १० लाख उपग्रह अंतराळात पाठविण्याची महत्त्वाकांक्षी योजना मांडली गेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात उपग्रह प्रक्षेपित झाल्यास पृथ्वीभोवतीची वाहतूक अधिक गुंतागुंतीची होईल आणि अंतराळ कचऱ्याचे प्रमाणही मोठ्या वेगाने वाढण्याची शक्यता आहे.

अंतराळ कचऱ्याशी संबंधित सर्वात धोकादायक संकल्पना म्हणजे 'केसलर सिंड्रोम'. या परिस्थितीत एका उपग्रहाची किंवा रॉकेटची धडक झाल्यावर निर्माण झालेला कचरा दुसऱ्या वस्तूंना धडकतो. त्यातून आणखी तुकडे तयार होतात आणि ही साखळी सतत वाढत राहते. जर ही परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली, तर पृथ्वीच्या काही कक्षा कायमस्वरूपी वापरण्यायोग्य राहणार नाहीत. परिणामी नवीन उपग्रह प्रक्षेपित करणे, मानवी अंतराळ मोहिमा राबविणे आणि भविष्यातील अनेक वैज्ञानिक संशोधन प्रकल्प अशक्य होऊ शकतात.

अंतराळ कचऱ्याचा धोका आता केवळ उपग्रहांपुरता मर्यादित राहिलेला नाही. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला (ISS) दरवर्षी किमान एकदा तरी संभाव्य धडक टाळण्यासाठी स्वतःची कक्षा बदलावी लागते. अंतराळवीरांसाठीही हा धोका गंभीर आहे. अगदी काही मिलीमीटर आकाराचा धातूचा कणदेखील अतिवेगामुळे अंतराळयानाच्या भिंतीला भेदू शकतो. त्यामुळे भविष्यातील चंद्र, मंगळ किंवा दीर्घकालीन अंतराळ मोहिमांसाठी अधिक सुरक्षित तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सध्या वापरात असलेली सर्वात सामान्य पद्धत म्हणजे मुदत संपलेले उपग्रह पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू देणे. वातावरणात घर्षणामुळे निर्माण होणाऱ्या प्रचंड उष्णतेमुळे ते जळून नष्ट होतात. उदाहरणार्थ, स्टारलिंकचा किमान एक उपग्रह जवळपास दररोज वातावरणात प्रवेश करून नष्ट होतो. मात्र, या प्रक्रियेत कार्बन आणि ॲल्युमिना (ॲल्युमिनियम ऑक्साइड) यांसारखे सूक्ष्म कण वातावरणात मिसळतात. वैज्ञानिकांच्या मते, या कणांचा पृथ्वीच्या ओझोन थरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वाढत आहे. सूर्याच्या घातक अतिनील किरणांपासून पृथ्वीवरील जीवनाचे संरक्षण करणाऱ्या ओझोन थरासाठी हा एक नवा पर्यावरणीय धोका मानला जात आहे.

अंतराळ कचरा कमी करण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) प्रभावी उपाययोजना राबवत आहे. पीएसएलव्ही-सी५६ मोहिमेदरम्यान इस्रोने उपग्रह यशस्वीपणे कक्षेत स्थापित केल्यानंतर रॉकेटचा शेवटचा टप्पा (PS4) नियोजितरीत्या पृथ्वीच्या खालच्या कक्षेत आणला. त्यामुळे तो दीर्घकाळ अंतराळात कचरा म्हणून फिरत राहिला नाही. याशिवाय, आयुष्य पूर्ण झालेल्या मेघा-ट्रॉपिक्स-१ (MT-1) उपग्रहाला सुरक्षितपणे पृथ्वीच्या वातावरणात आणून त्याचे प्रशांत महासागरावर विघटन करण्यात आले. ही मोहीम जगभरात कौतुकास्पद ठरली. भारताने उपग्रहांचे आयुष्य संपल्यानंतर त्यांचे नियोजित विसर्जन करण्याची जबाबदार भूमिका स्वीकारली असून, ही भविष्यातील अंतराळ व्यवस्थापनासाठी महत्त्वाची दिशा मानली जाते.

अंतराळ कचरा हटविण्यासाठी अनेक देश आणि खासगी कंपन्या अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करत आहेत. यामध्ये विशेष जाळे (नेट) वापरून कचरा पकडणे, हार्पूनसारख्या यंत्राद्वारे मोठ्या वस्तूंना ओढून आणणे, चुंबकीय प्रणालींचा वापर, सौर पाल (Solar Sail), इलेक्ट्रोडायनामिक टेथर, लेझर तंत्रज्ञान,

रोबोटिक हात, स्वयंचलित स्वच्छता उपग्रह यांसारख्या तंत्रज्ञानांवर संशोधन सुरू आहे. जपानची ॲस्ट्रोस्केल, युरोपियन अंतराळ संस्था, नासा, जर्मनीची डीएलआर तसेच अनेक स्टार्टअप कंपन्या या क्षेत्रात सक्रिय आहेत. वैज्ञानिकांनी सर्वाधिक धोकादायक ५० अंतराळ वस्तूंची स्वतंत्र यादी तयार केली असून त्यांना प्रथम हटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अंतराळ अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत आहे. उपग्रह इंटरनेट, पृथ्वी निरीक्षण, हवामान बदल, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अवकाश पर्यटन यामुळे पुढील काही दशकांत हजारो नव्हे, तर लाखो नवीन उपग्रह अंतराळात जाणार आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रक्षेपणासोबत कचरा व्यवस्थापनाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे. भविष्यात प्रत्येक उपग्रहासाठी 'एंड-ऑफ-लाइफ प्लॅन', कक्षेतील वाहतूक नियंत्रण (Space Traffic Management), आंतरराष्ट्रीय नियम आणि कचरा हटविण्याची सक्ती या गोष्टी अपरिहार्य ठरतील.

मानवाने अंतराळ जिंकण्याच्या प्रयत्नात विज्ञानाची मोठी झेप घेतली आहे; परंतु त्याचबरोबर अंतराळ प्रदूषणाचे संकटही निर्माण केले आहे. पृथ्वीवरील पर्यावरणाप्रमाणेच आता अंतराळाचे पर्यावरण जपण्याची वेळ आली आहे. अन्यथा, केसलर सिंड्रोमसारखी परिस्थिती निर्माण होऊन भविष्यातील अनेक अंतराळ मोहिमा, दळणवळण व्यवस्था आणि वैज्ञानिक प्रगती धोक्यात येऊ शकते. अंतराळ हे संपूर्ण मानवजातीची सामायिक संपत्ती आहे. त्यामुळे त्याची स्वच्छता, सुरक्षितता आणि शाश्वत वापर ही कोणत्याही एका देशाची नव्हे, तर संपूर्ण जगाची सामूहिक जबाबदारी आहे. विज्ञानातील प्रगतीसोबत जबाबदार अंतराळ व्यवस्थापनाची सांगड घातली, तरच भविष्यातील अंतराळ संशोधन सुरक्षित, शाश्वत आणि मानवकल्याणासाठी उपयुक्त ठरेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# प्लास्टिकला नकार...हरित भविष्याचा स्वीकार!



दरवर्षी ३ जुलै हा दिवस जागतिक पातळीवर 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन' म्हणून पाळला जातो. या दिवशी पर्यावरणपूरक सवयींचा अवलंब करण्यासाठी जगभरात जनजागृती केली जाते. प्लास्टिकचा वाढता वापर आज पर्यावरणासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक बनला आहे. विशेषतः एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्या माती, जलस्रोत, वन्यजीव आणि मानवी आरोग्यावर दीर्घकालीन घातक परिणाम करतात. या समस्येबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संदेश देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसानिमित्त प्रत्येकाने प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी व पुनर्वापर करता येणाऱ्या पर्यायांचा स्वीकार करण्याचा संकल्प करूया. प्लास्टिकला नकार... हरित भविष्याचा स्वीकार! हा संदेश कृतीत उतरवणे हीच पर्यावरणाप्रती खरी जबाबदारी आहे.

एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्या, कप, प्लेट, स्ट्रॉ, चमचे, बाटल्या आणि इतर प्लास्टिक वस्तू वापरण्यास सोयीस्कर वाटतात; परंतु त्यांचा पर्यावरणावर अत्यंत घातक परिणाम होतो. अशा वस्तू काही मिनिटांसाठी वापरल्या जातात, मात्र त्यांचे विघटन होण्यासाठी शेकडो वर्षे लागतात. परिणामी माती, नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषित होतात. प्लास्टिक कचऱ्यामुळे प्राणी, पक्षी आणि सागरी जीवांच्या जीविताला धोका निर्माण होतो, तसेच सूक्ष्म प्लास्टिक अन्नसाखळीत प्रवेश करून मानवी आरोग्यावरही विपरीत परिणाम घडवते. या समस्येवर प्रभावी उपाय म्हणजे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंचा वापर शक्य तितका टाळणे. त्यांच्या ऐवजी कापडी पिशव्या, कागदी पिशव्या, स्टील, काच, माती किंवा बांबूपासून तयार केलेल्या पुनर्वापरयोग्य वस्तूंचा वापर करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात हा छोटासा बदल स्वीकारला, तर प्लास्टिक प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि स्वच्छ, निरोगी व हरित पर्यावरण निर्माण करण्यास मोलाची मदत होईल.

आजच्या काळात पर्यावरण संरक्षण ही केवळ जबाबदारी नसून एक गरज बनली आहे. बाजारात खरेदी करताना प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो, मात्र या पिशव्या पर्यावरणासाठी अत्यंत घातक आहेत. त्यामुळे प्रत्येकाने खरेदीसाठी नेहमी कापडी, ज्यूट किंवा इतर पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करण्याची सवय लावणे आवश्यक आहे. कापडी व ज्यूट पिशव्या टिकाऊ, पुनर्वापरयोग्य आणि पर्यावरणास अनुकूल असतात. या पिशव्यांचा वापर केल्याने प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण कमी होते आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवता येते. तसेच या सवयीमुळे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होऊन स्वच्छ आणि हरित पर्यावरण निर्माण होण्यास मदत होते.

प्रत्येक नागरिकाने जर ही साधी सवय अंगीकारली, तर प्लास्टिकमुक्त समाज निर्माण होण्यास मोठा हातभार लागेल. म्हणूनच प्लास्टिक टाळा, कापडी पिशवी वापरा हा संदेश प्रत्येक घराघरात पोहोचवणे काळाची गरज आहे.

प्लास्टिक कचरा हा आजच्या काळातील सर्वात गंभीर पर्यावरणीय प्रश्नांपैकी एक आहे. रस्त्यावर, नाल्यांमध्ये, नद्यांमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकलेला प्लास्टिक कचरा केवळ अस्वच्छता निर्माण करत नाही, तर जलप्रदूषण, मृदाप्रदूषण आणि जैवविविधतेवरही गंभीर परिणाम करतो. त्यामुळे प्लास्टिक कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे अत्यंत आवश्यक आहे. प्लास्टिक कचरा इतर कचऱ्यापासून वेगळा करून त्याचे योग्य वर्गीकरण करणे गरजेचे आहे. पुनर्वापरयोग्य प्लास्टिक पुनर्चक्रण केंद्रात (Recycling Units) पाठवले तर त्याचा पुन्हा उपयोग करून नवीन वस्तू तयार करता येतात. यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होते आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागून प्लास्टिक कचरा योग्य ठिकाणी टाकणे, तसेच पुनर्चक्रण प्रक्रियेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामुळे स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण करण्यास मोठी मदत होईल. पर्यावरण संरक्षणासाठी जगभरात मान्य असलेले सर्वात प्रभावी तत्त्व म्हणजे ठशर्वीलश, ठशींीश, ठशलूलश्रश अर्थात कमी वापर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण. ही त्रिसूत्री केवळ घोषवाक्य नसून ती पर्यावरण संतुलन राखण्यासाठी एक जीवनशैली आहे.

ठशर्वीलश (कमी वापर): आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक वस्तूंचा वापर कमी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः प्लास्टिक, पाणी आणि उर्जेचा जपून वापर केल्यास संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होते. ठशींीश (पुनर्वापर): वस्तू फेकून न देता त्यांचा पुन्हा उपयोग करणे ही पर्यावरणपूरक सवय आहे. काच, धातू, कापड किंवा इतर टिकाऊ वस्तूंचा पुनर्वापर केल्याने कचरा कमी होतो आणि खर्चही वाचतो. ठशलूलश्रश (पुनर्चक्रण): वापरून टाकलेल्या वस्तूंचे पुनर्चक्रण करून त्यापासून नवीन उत्पादने तयार केली जातात. यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण कमी होतो आणि प्रदूषण नियंत्रणात राहते. प्रत्येक व्यक्तीने या त्रिसूत्रीचा अवलंब केल्यास पर्यावरण संरक्षणास मोठा हातभार लागेल आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व हरित पृथ्वी घडवता येईल. प्लास्टिकचा अतिरेकी वापर हा आजच्या काळातील पर्यावरणीय संतुलन बिघडवणारा एक प्रमुख घटक आहे. प्लास्टिकमुळे माती, पाणी, हवा आणि जैवविविधतेवर गंभीर आणि दीर्घकालीन दुष्परिणाम होतात. त्यामुळे या समस्येचे गांभीर्य समजून घेणे आणि त्याबाबत समाजात जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्लास्टिक मातीमध्ये मिसळल्यास तिची सुपीकता कमी होते आणि शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. पाण्यात टाकलेले प्लास्टिक जलप्रदूषण निर्माण करते, ज्यामुळे पिण्याचे पाणी दूषित होते आणि जलचर जीवांचे जीवन धोक्यात येते. प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू निर्माण होतात, जे हवेचे प्रदूषण वाढवतात आणि मानवी आरोग्यास हानी पोहोचवतात. तसेच प्लास्टिक कचऱ्यामुळे पक्षी, प्राणी आणि सागरी जीव अडकून पडतात किंवा त्यांचा मृत्यू होतो, ज्यामुळे जैवविविधतेचे मोठे नुकसान होते. या सर्व गंभीर परिणामांमुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच प्रत्येकाने प्लास्टिकचे दुष्परिणाम समजून घेऊन स्वतः पुरते मर्यादित न राहता समाजातील इतरांनाही जागरूक करणे आवश्यक आहे. जागरूक नागरिकच पर्यावरण संवर्धनाचा खरा आधारस्तंभ असतो.

प्लास्टिकचा बेफिकीर वापर हा केवळ मानवासाठीच नव्हे, तर संपूर्ण जैवविविधतेसाठी गंभीर धोका निर्माण करतो. रस्त्यावर, जंगलात किंवा जलस्रोतांमध्ये फेकलेले प्लास्टिक प्राणी, पक्षी आणि सागरी जीवांच्या जीवितासाठी घातक ठरते. अनेकदा हे जीव प्लास्टिकला अन्न समजून गिळतात, ज्यामुळे त्यांच्या पचनसंस्थेत अडथळे निर्माण होतात आणि त्यांचा मृत्यूही होऊ शकतो. समुद्रातील मासे, कासवे आणि इतर जलचर जीव प्लास्टिक कचऱ्यामुळे सर्वाधिक प्रभावित होतात. त्याचप्रमाणे पक्षी आणि भटके प्राणीही प्लास्टिकमध्ये अडकून जखमी होतात किंवा जीव गमावतात. यामुळे नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत होऊन पर्यावरणीय संतुलन बिघडते. म्हणूनच, प्राणी, पक्षी आणि सागरी जीवांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टिकचा वापर अत्यंत मर्यादित करणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करून आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून आपण या जीवांचे संरक्षण करू शकतो. प्रत्येकाने जबाबदारीने वागून प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारली, तर निसर्गातील प्रत्येक जीव सुरक्षित आणि संतुलित वातावरणात जगू शकेल. वाढदिवस, समारंभ, सहली आणि विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. मात्र हा वापर पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक ठरतो. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंच्या जागी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमांमध्ये प्लास्टिकच्या प्लेट्स, कप, चमचे आणि सजावटीच्या वस्तूंऐवजी कागदी, बांबू, स्टील किंवा काचेच्या वस्तूंचा वापर केल्यास कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. तसेच कापडी बॅनर, नैसर्गिक फुले आणि पुनर्वापरयोग्य सजावटीच्या साहित्याचा वापर करून कार्यक्रम अधिक पर्यावरणस्नेही बनवता येतो.

अशा छोट्या बदलांमुळे मोठा पर्यावरणीय परिणाम साधता येतो. प्रत्येक व्यक्तीने जर आपल्या वैयक्तिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक टाळण्याचा संकल्प केला, तर स्वच्छ, सुंदर आणि हरित पर्यावरण घडविण्यास मोठा हातभार लागेल. पर्यावरणाचे संरक्षण हे केवळ सरकार किंवा संस्थांचे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचे सामूहिक कर्तव्य आहे. वाढत्या प्रदूषणामुळे आणि प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे नैसर्गिक संतुलन धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने वर्षातून किमान काही झाडे लावून आणि प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

झाडे लावल्याने केवळ हरित क्षेत्र वाढत नाही, तर हवा शुद्ध राहते, तापमान नियंत्रित राहते आणि जैवविविधतेला आधार मिळतो. त्याचबरोबर प्लास्टिकचा वापर कमी केल्यास माती, पाणी आणि पर्यावरणावरील ताण कमी होतो. लहान-लहान वैयक्तिक प्रयत्न एकत्रितपणे मोठा बदल घडवू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून जबाबदार वर्तन करणे आवश्यक आहे. यामुळे स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत भविष्य घडविण्यास निश्चितच मदत होईल. स्वच्छ, हरित आणि शाश्वत भविष्य घडविण्यासाठी प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. वाढत्या प्लास्टिक वापरामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असून माती, पाणी आणि हवेचे प्रदूषण वाढत आहे. या समस्येवर मात करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार केल्यास नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते आणि स्वच्छ पर्यावरण निर्माण होण्यास मदत मिळते. कापडी पिशव्या, पुनर्वापरयोग्य वस्तू आणि टिकाऊ साधनांचा वापर ही काळाची गरज आहे. म्हणूनच, आपण सर्वांनी आजच संकल्प करूया की प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणसंवर्धनासाठी सक्रिय योगदान देऊ. एक छोटा संकल्पही भविष्यात मोठा बदल घडवू शकतो आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी निर्माण करू शकतो.

आज आपण प्लास्टिकला नकार दिला, तर उद्याची पिढी आपले आभार मानेल. चला, पर्यावरण रक्षणासाठी एकत्र येऊया! ही केवळ घोषणा नसून आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा संकल्प आहे. प्लास्टिकचा अतिरेकी वापर कमी करून पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपण आज घेतलेला छोटासा निर्णय उद्याच्या स्वच्छ, हरित आणि सुरक्षित पृथ्वीचा पाया ठरू शकतो. म्हणूनच, एकत्र येऊन प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करूया आणि भावी पिढ्यांसाठी सुंदर, निरोगी व शाश्वत पर्यावरण घडवूया.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो.नं.९७६७८३०४९८

# देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे.

दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते.



विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेलीमुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ‘नयन बाराहाते म्हणजे रंग आणि रेषांचा आनंदयात्री’ -डॉ. सुरेश सावंत

## ▸ नांदेडमध्ये रंगला ‘नयन बाराहाते स्मृती सन्मान’ सोहळा
## ▸ ज्येष्ठ चित्रकार, कवी भ. मा. परसवाळे यांचा पुरस्काराने गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)–** चित्रकार नयन बाराहाते हा रंग आणि रेषांचा चित्रकथी, आनंदयात्री होता. त्याने आपल्या रंगरेषा, कल्पकता आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून पुस्तकांना केवळ मुखपृष्ठ दिले नाही, तर प्रत्येक कलाकृतीला एक स्वतंत्र असे कलात्मक व्यक्तिमत्त्व बहाल केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केले. ‘नयन बाराहाते स्मृती सन्मान’ सोहळ्यात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

डॉ. सावंत पुढे म्हणाले की, नयन बाराहाते यांची कला ही केवळ चित्रांपुरती मर्यादित नव्हती; तर ती साहित्य, सामाजिक संवेदना आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणारी होती. त्यांच्या कलाकृतींमधून विचार, भावना आणि सौंदर्य यांचा अप्रतिम संगम अनुभवायला मिळत असे. त्यामुळे त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. प्रख्यात चित्रकार, पुस्तक रचनाकार आणि कलंदर कलावंत नयन बाराहाते यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्मरण सोहळ्यात यंदाच्या ‘नयन बाराहाते स्मृती सन्मान’ पुरस्काराने ज्येष्ठ चित्रकार आणि कवी भ. मा. परसवाळे यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात आला.

हा सोहळा सृजन कम्युनिकेशन्स आणि नयन अक्षर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात वक्त्यांनी कला, साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांवर सखोल चिंतन व्यक्त केले. यावेळी डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर आणि डॉ. राजेंद्र गोणारकर यांची विचारपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नयन बाराहाते यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. नयन बाराहाते यांच्या कन्या सायली बाराहाते यांनी प्रास्ताविकातून वडिलांच्या कलासाधनेचा आणि त्यांच्या स्मृती जपण्यामागील भावनेचा वेध घेतला. त्यानंतर डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी मानपत्राचे वाचन केले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर भ. मा. परसवाळे यांनी कला, साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधांविषयी आपले मनोगत व्यक्त करत सर्जनशीलतेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. शिवाजी आंबुलगेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

नयन बाराहाते हे केवळ चित्रकार नव्हते, तर पुस्तकांना आपल्या रंगरेषांतून जिवंत करणारे एक संवेदनशील कलावंत होते. मुखपृष्ठ, आतील मांडणी आणि पुस्तकाची कलात्मक सजावट यामध्ये त्यांनी स्वतंत्र शैली निर्माण केली होती. त्यांच्या स्मरणार्थ गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्रातील एका उत्कृष्ट चित्रकाराचा ‘नयन बाराहाते स्मृती सन्मान’ देऊन गौरव करण्याची परंपरा जपली जात आहे.

कार्यक्रमाला नांदेडसह विविध भागांतील साहित्यिक, चित्रकार, पत्रकार, कलाप्रेमी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नयन बाराहाते यांच्या कलास्मृतींना उजाळा देणारा आणि नव्या पिढीतील कलाकारांना प्रेरणा देणारा हा सोहळा भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी डीडीएचआय अंतर्गत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत सरकारच्या डाटा ड्रायवेन हायपरलोकल इंटरवेशन (डीडीएचआय) या उपक्रमांतर्गत येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सूचनेनुसार एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच पार पडली.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे, प्रकल्प संचालक महेश पाटील आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच आयआयटी मद्रासच्या ‘सेंटर ऑफ एक्सेलन्स फॉर रोड सेफ्टी’ येथील तज्ज्ञ रोशन जोस आणि प्रदीप कुमार उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना रस्ता सुरक्षा ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करण्यात आले. जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीस, आरटीओ, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक आदी विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधून उपाययोजना राबविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

या अनुषंगाने संबंधित विभागांतील प्रत्यक्ष काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कोणत्या उपाययोजनात्मक कार्यवाही कराव्यात, तसेच आवश्यक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांमध्ये नांदेड जिल्ह्याची या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी निवड करण्यात आली असून, त्याअंतर्गत अपघातांचे वैज्ञानिक विश्लेषण, डेटा-आधारित नियोजन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला.

कार्यशाळेत आयआयटी मद्रासच्या CoERS तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली iRD/eDR प्रणालीचा प्रभावी वापर, अपघातांची कारणमीमांसा तसेच विविध विभागांतील समन्वय अधिक सक्षम करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

तसेच DDHI/FPS अर्ज प्रक्रिया, FPS- क्षेत्रीय सज्जता सर्वेक्षण, TPL- आघातविषयक सज्जता स्तर, धोका ओळख, अहवाल प्रणाली तसेच भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. ट्रॉमा केअर व आपत्कालीन प्रतिसाद यावर स्वतंत्र सविस्तर सत्र आयोजित करण्यात आले. निवडक ठिकाणी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आणि क्षेत्रीय सरावही घेण्यात आला.

या उपक्रमामुळे जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा व्यवस्थापन अधिक परिणामकारक होऊन अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेत पोलीस विभाग, आरटीओ, रस्ता मालकी संस्था, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांचे अधिकारी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीताने करण्यात आली.

# लायन्सच्या प्रांतीय ‘डायमंड अवॉर्ड’ने गंगाबिशन कांकर यांचा गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)–** लायन्स क्लबच्या सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणारे लायन गंगाबिशन कांकर यांना लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३४-H2 च्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या सर्वोच्च व मानाच्या बेस्ट रिजन चेअरपर्सन ऑफ द डिस्ट्रिक्ट डायमंड अवॉर्ड’ ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार नुकत्याच अकोला येथे पार पडलेल्या प्रांतीय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

गेल्या दशकभराहून अधिक काळ लायन्स चळवळीत निःस्वार्थ सेवा, प्रभावी संघटन कौशल्य आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे लायन गंगाबिशन कांकर यांनी जिल्हा तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. रिजन चेअरपर्सन म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सर्वोच्च सन्मान बहाल करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रांतपाल लॉ. अश्विनकुमार बाजोरिया, आयडीजी लॉ. गिरीश सिसोदिया, प्रथम उपप्रांतपाल लॉ. योगेशकुमार जायसवाल, प्रांतीय सचिव लॉ. प्रदीप गर्ज, प्रांतीय कोषाध्यक्ष लॉ. कैलाश मुरारका यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लायन्स क्लबमध्ये त्यांनी यापूर्वी प्रांतीय सहकोषाध्यक्ष, क्लब सचिव, क्लब अध्यक्ष, झोन चेअरपर्सन आदी महत्त्वाची पदे यशस्वीपणे भूषविली आहेत. याशिवाय गीता परिवार मराठवाडा, मारवाडी युवा मंच, विप्र समाज, कर सल्लागार संघटना तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय सहभागातून त्यांनी समाजसेवेचा ठसा उमटविला आहे. या प्रतिष्ठेच्या पुरस्कारामुळे सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून लायन गंगाबिशन कांकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. बी. एस. रेड्डी, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, किरण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# कै. गोविंदराव काळे शहरी आरोग्य केंद्र येथे पल्स पोलिओ लसीकरणाचा प्रभागातील नगरसेवकांच्या उपस्थितीत शुभारंभ



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक पल्स पोलिओ लसीकरणाचा शुभारंभ मनपाच्या जुना कौठा नांदेड येथे २८ जून रोजी मनपाचे भाजपा नगरसेवक सौ. अनुराधा राजू पाटील काळे, श्रीमती सुलोचना धोंडीबाराव काकडे, अभिषेक सौदे, सामाजिक कार्यकर्ते गणेश काकडे, विनोद काकडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या मोहिमेला डॉक्टर, परिचारिका व आशा वर्कर्स यांनी बालकांना पल्स पोलिओचे दोन थेंब देऊन सुरूवात केली.

नांदेड मनपातील आरोग्य विभागाच्या वतीने जुना कौठा नांदेड येथे जागतिक पल्स पोलिओ लसीकरण शुभारंभ कै.गोविंदराव काळे शहरी आरोग्य केंद्र येथे करण्यात आला. यावेळी मनपाच्या प्रभाग क्रमांक १९ मधील नगरसेवक उपस्थित होते. या वेळी परिसरातील १ ते ५ वयोगटातील शेकडो बालकांना प्लस पोलिओचे दोन थेंब पाजविण्यात आले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण पवार, आरोग्य कर्मचारी बगाटे एस. एम., आरोग्यसेविका श्रीमती ज्योती सुरनर, प्रकाश कंधारे, श्रीमती सुनिता तागवलवाड, आरोग्यसेविका, रवी राठोड यांच्यासह आशा कार्यकर्ती व दवाखान्यातील कर्मचारी, अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या सिव्हील सर्जनपदी डॉ. नंदकिशोर सारंग यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** वसमत तालुक्यातील हयातनगर येथील भूमिपुत्र तथा जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकिशोर विश्वनाथ सारंग हे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या सिव्हील सर्जन पदासाठी ते पात्र झाले असून, त्यांच्या यशाबद्दल हयातनगर येथे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सिव्हिल सर्जन पदाच्या परीक्षेत ते पात्र ठरल्याबद्दल हयातनगर ग्रामस्थांनी ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांची आतीषबाजी करून त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी सरपंच रूस्तूम राऊत, नागनाथ कदम, उपसरपंच मोहन सारंग, माजी सरपंच गजानन राहटीकर, संतोष गिरी, विष्णू अंभुरे, नरहरी कोकरे व ग्रामस्थांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैदराबाद (भोसले गोपाळराव पाटील आय सेंटर, मुधोळ) यांच्या सहकार्याने, मुक्तांगण सेवाभावी संस्था, धर्माबाद व कै. के. रामलू प्रतिष्ठान, कुंडलवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण २६२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान ८२ रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे नवीन निदान, तर ४४ रुग्णांमध्ये डोळ्याच्या मांसवृद्धीचे निदान झाले. शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या रुग्णांवर मुधोळ येथील भोसले गोपाळराव पाटील आय सेंटरमध्ये मोफत शस्त्रक्रिया व मोफत लेन्स बसविण्यात येणार असून, त्यांना आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. तसेच रुग्णांच्या ने-आणसाठी कुंडलवाडी नगर परिषदेपासून सकाळी मोफत वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन लक्ष्मणराव ठक्कुरवार यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून या आरोग्यविषयक शिबिरांची समाजाला मोठी गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार या होत्या. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी कुंडलवाडी शहरात भविष्यातही अशा प्रकारची अधिकाधिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्षा सौ. नेहाताई शैलेश ऱ्याकावार, साईनाथ उत्तरवार, राजेश्वर उत्तरवार, गंगाधर पोरडवार, प्रा. डॉ. गोविंद चौधरी तसेच डॉ. हनुमंतराव लखमपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शैलेश ऱ्याकावार, इंजि. अशोक गरुडकर, डॉ. टी. लक्ष्मण चिन्णा, नगरसेवक डॉ. प्रशांत सब्बनवार, नगरसेवक प्रकाश पाटील अर्जने, नगरसेवक प्रदीप खेळगे, सर्व नगरसेवक, नगरसेविका तसेच एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूटचे सर्व सहकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात नवनिर्वाचित भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अभिजीत धरमुरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# अभियंता आनंद पाटील शिंदे यांचे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळातील अभियंता पदाच्या परीक्षेत आनंद दिगंबर पाटील शिंदे यांनी यश संपादन केले आहे. या परीक्षेत त्यांनी राज्यात १२ वा क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशाबद्दल धनेगाव ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

धनेगाव येथील सामाजिक, धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग घेणारे आनंद शिंदे यांनी एमपीएससी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल धनेगावात त्यांचा सत्कार करण्यात आला.

आनंद शिंदे यांना माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, धनेगाव ग्रामपंचायत सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटू पाटील शिंदे, पोलीस निरीक्षक प्रभाकर कवाळे, ग्रामविकास अधिकारी मनोहर शिंदे, संतोष कवाळे, पत्रकार दिंगबर शिंदे यांच्यासह ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# लिपीक रत्नाकर सर्ज प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील कारेगाव येथील संत मोतीराम महाराज



हायस्कूलचे लिपीक रत्नाकर सूर्यभान सर्ज हे नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त होत झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला.

रत्नाकर सर्ज यांनी या सत्कार समारंभात बोलताना म्हटले की, सेवा काळात संस्थाचालक गणेश घोरबांड व गजानन ज्ञानोबा मोरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाल्यामुळे आपण यशस्वी कार्यकाळ पूर्ण करू शकलो.

३० जून रोजी कारेगाव येथे शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांना उत्साहात निरोप देण्यात आला.

# सरस्वती पगारदार पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध




**लोहा (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात शिक्षक पगारदार पतसंस्थेत अव्वल क्रमाकांची पतसंस्था म्हणून अग्रस्थानी असलेल्या लोह्याच्या सरस्वती शिक्षक पगारदार पतसंस्थेची यंदाही पंचवार्षिक निवडणूक (२००६-२०३१) संस्थापक प्राचार्य राजेंद्र भोसीकर यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध पार पडली. चेअरमन म्हणून नरेंद्र आपाराव चव्हाण, व्हाईस चेअरमनपदी दामोधर वडजे तर सचिव म्हणून फैजुद्दीन गियासोद्दीन यांची निवड करण्यात आली आहे

१९९२ मध्ये अस्तित्त्व आलेल्या सरस्वती शिक्षक पगारदार पतसंस्थेची निवडणूक कधीही झाली नाही. संस्थापक प्राचार्य राजेंद्र भोसीकर, माजी व्हाईस चेअरमन हरिभाऊ चव्हाण, मुख्याध्यापाक अनिल हामदे, हरिहर धुतमल, कार्यालयीन प्रमुख डी. एन. ठाकूर व सहकारी यांनी यावेळीही संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडावी यासाठी प्रयत्न केले.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी रवी कांबळे यांच्या उपस्थितीत २९ जून रोजी चेअरमन, व्हाईस चेअरमन व सचिव पदाची निवड पार पडली. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डी. एन. ठाकूर होते. कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक व प्राथमिक शाळा, नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक उच्च व माध्यमिक विद्यालय पानभोसी, महेश विद्यालय शेवडी, शिवछत्रपती प्राथमिक, माध्यमिक शाळा व डॉ याकूबखान उर्दू प्राथमिक शाळा यांचा पतसंस्थेत समावेश आहे.

# फॉर्मर कप उपक्रमाचा डिजिटल शुभारंभ; महिला बचत गटांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन



**मुदखेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पाणी फाउंडेशनचे ब्रँड ॲम्बेसेडर आमिर खान यांच्या हस्ते ‘फॉर्मर कप’ उपक्रमाचा डिजिटल शुभारंभ करण्यात आला. तालुका कृषी अधिकारी कार्यालय मुदखेड येथे या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, यंदाचे वर्ष अल निनोचे वर्ष असून हेच वर्ष शेतकरी महिलांचे वर्ष म्हणूनही साजरे केले जाणार आहे. राज्यातील प्रत्येक महिलेला शेतकरी म्हणून योग्य दर्जा मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या वर्षीचे अल निनो हे एक आव्हान आहे. यावर्षीची बॅटिंग चांगली झाली तर पुढे शतक करता येईल. संकटे कितीही मोठी असली तरी धैर्य, जिद्द आणि योग्य नियोजनाच्या बळावर त्यावर मात करता येते. तसेच महिला बचत गट ही केवळ योजना नसून एक सामाजिक चळवळ आहे. या चळवळीची मुळे आज मजबूत झाली असून, त्याच्या फांद्या राज्यभर विस्तारत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमानंतर तालुका कृषी अधिकारी डॉ. अमर- ज्योती गच्चे यांनी उपस्थित महिला गटांना खरीप हंगामातील सोयाबीन व इतर पिकांच्या शास्त्रशुद्ध लागवडीबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी बियाण्याची उगवणक्षमता तपासणे, बीजप्रक्रिया करणे, टोकन पद्धत व बीबीएफ पद्धतीने लागवड करण्याचे महत्त्व विशद केले.

शेतीचा खर्च कमी करण्यासाठी घरी तयार केलेले निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक वनस्पती संरक्षण द्रावणांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महिला बचत गटांना दर्जेदार बियाण्यांची निवड, बियाणे खरेदी करताना मिळणारी सवलत तसेच बियाण्याची उगवणक्षमता तपासण्याचे महत्त्व याबाबतही माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात मेंटॉर अनुप मोरे यांनी महिला बचत गटांना फॉर्मर कप उपक्रमाची माहिती देत मार्गदर्शन केले. तसेच सर्व गटांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी उपस्थितांचे आभार गीते यांनी मानले. याप्रसंगी मंडळ कृषी अधिकारी राम कपाटे, कृषी अधिकारी सौ. देशमुख, उप कृषी अधिकारी ढोले तसेच तालुक्यातील सर्व सहायक कृषी अधिकारी उपस्थित होते.

# पद्मजा कुलकर्णी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री छत्रपती शिक्षण संस्था संचलित कुसुमताई विद्यालय सिडको येथील विज्ञान विषयाच्या शिक्षिका सौ.



पदमजा प्रफुल्लकुमार कुलकर्णी ह्या तीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवानिवृत्ती निमित्ताने कुसुमताई विघालय येथे सपत्नीक सत्कार करण्यात आला आहे.

कुसुमताई विद्यालयात १ जुलै १९९६ रोजी रूजू झाल्यानंतर विज्ञान विषयाच्या शिक्षिका त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व अध्यापन केले. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल संस्थेचे सचिव संभाजी बिरादार, मुख्याध्यापिका सौ. शशीकला बिरादार, प्राथमिक. मुख्याध्यापिक सौ. कारामुंगे यांच्यासह पर्यवेक्षक सौ. उज्ज्वला सावते, शेख निझाम गवंडगावकर अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# अंतर्मन



# आषाढ गुप्त नवरात्रीचा प्रारंभ कधी?

## घटस्थापनेचा शुभ मुहूर्त अन् महत्त्व जाणून घ्या...

**आषाढ शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीपासून गुप्त नवरात्रीला प्रारंभ होतो. या काळात देवीच्या दहा महाविद्यांची उपासना केली जाते. वर्षभरात एकूण चार नवरात्र उत्सव येतात. त्यापैकी दोन गुप्त नवरात्र असतात एक माघ महिन्यात आणि दुसरी आषाढ महिन्यात. तांत्रिक साधक, अघोरी आणि मंत्रसाधकांसाठी हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या नऊ दिवसांत देवीची आराधना केल्यास विशेष पुण्यफळ आणि साधनेत यश प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.**

यंदा आषाढ गुप्त नवरात्रीचा प्रारंभ बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी होणार आहे. आषाढ शुक्ल प्रतिपदा तिथीची सुरुवात मंगळवार, १४ जुलै रोजी दुपारी ३ वाजून १४ मिनिटांनी होईल. ही तिथी बुधवार, १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजून ५२ मिनिटांपर्यंत राहील. उदया तिथीनुसार १५ जुलैपासून गुप्त नवरात्रीची सुरुवात मानली जाईल. बुधवार, २२ जुलै २०२६ रोजी नवमी तिथी असल्याने त्याच दिवशी आषाढ गुप्त नवरात्रीची सांगता होईल.



### घटस्थापनेचा शुभ मुहूर्त

- ज्योतिषतज्ज्ञांच्या मते, १५ जुलै २०२६ रोजीच घटस्थापना करावी.
- शुभ वेळ : सकाळी ८ वाजून २ मिनिटांनी
- नक्षत्र : पुष्य
- या वेळी हर्षण योग असल्यामुळे घटस्थापनेसाठी हा अत्यंत शुभ मुहूर्त मानला जातो. त्यानंतर वज्र योग सुरू होईल.

### महत्त्वाच्या तारखा

- आषाढ गुप्त नवरात्री प्रारंभ : बुधवार, १५ जुलै २०२६
- आषाढ गुप्त नवरात्री समाप्त : बुधवार, २२ जुलै २०२६
- घटस्थापनेचा शुभ मुहूर्त : १५ जुलै, सकाळी ८:०२ (पुष्य नक्षत्र)

### गुप्त नवरात्रीचे महत्त्व

आषाढ महिन्यातील गुप्त नवरात्री सर्वसामान्यांमध्ये चैत्र किंवा शारदीय नवरात्रीइतकी प्रचलित नसली, तरी तांत्रिक साधना करणाऱ्यांसाठी तिचे विशेष महत्त्व आहे. या काळात सामान्य भाविक देवी दुर्गेची विधीवत पूजा करतात, तर तांत्रिक, अघोरी आणि मंत्रसाधक विविध साधना करून सिद्धी प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. गुप्त नवरात्रीत देवीच्या दहा महाविद्यांची भक्तिभावाने उपासना केली जाते. या महाविद्या अत्यंत शक्तिशाली मानल्या जातात. त्यांच्या कृपेने जीवनातील संकटे दूर होतात, मनोकामना पूर्ण होतात आणि साधकाला विशेष आध्यात्मिक फळ प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.

### देवीच्या दहा महाविद्या

- काली, तारा, त्रिपुरसुंदरी, भुवनेश्वरी, भैरवी, छिन्नमस्ता, धूमावती, बगलामुखी, मातंगी, कमलात्मिका

# Y अक्षराने नाव सुरू होणाऱ्या व्यक्तींना आवडत नाहीत बंधने


## स्वत:च्या अटींवर जगणे करतात पसंत, जाणून घ्या व्यक्तिमत्त्व, प्रेमजीवन अन् करिअर...

**अंकशास्त्रानुसार, ज्या व्यक्तींच्या नावाची सुरुवात Y या इंग्रजी अक्षराने होते, त्यांच्यावर सूर्य ग्रहाचा प्रभाव अधिक असल्याचे मानले जाते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळे तेज, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण दिसून येतात. अशा व्यक्तींना कोणत्याही प्रकारची बंधने किंवा अनावश्यक हस्तक्षेप आवडत नाही. त्या स्वतःच्या तत्त्वांनुसार आणि स्वतःच्या पद्धतीने आयुष्य जगणे पसंत करतात.**

- परिपूर्णतेचा ध्यास : या व्यक्तींना प्रत्येक काम अत्यंत नीटनेटके आणि परिपूर्ण पद्धतीने पूर्ण करायला आवडते. एखादा निर्णय घेतल्यानंतर ते सहजपणे त्यापासून मागे हटत नाहीत. प्रत्येक गोष्ट उत्कृष्ट व्हावी, यासाठी ते मनापासून प्रयत्न करतात.
- नेतृत्वगुण जन्मजात : सूर्याच्या प्रभावामुळे या व्यक्तींमध्ये नेतृत्व करण्याची क्षमता लहानपणापासूनच दिसून येते. कोणत्याही क्षेत्रात जबाबदारी मिळाल्यास ते सक्षम नेतृत्व करतात. तसेच, विचारपूर्वक आणि संतुलित निर्णय घेण्यातही ते कुशल असतात.
- बंधने आणि रोखठोकपणा आवडत नाही : Y अक्षराने नाव सुरू होणाऱ्या व्यक्तींना कोणाच्याही नियंत्रणाखाली राहणे आवडत नाही. त्यांना स्वतःच्या अटींवर, स्वतःच्या विचारांनुसार आणि स्वतंत्रपणे जीवन जगणे अधिक पसंत असते.
- भावना सहज व्यक्त करत नाहीत : हे लोक बाहेरून अत्यंत आत्मविश्वासू दिसतात; मात्र मनात अनेक गोष्टी दडवून ठेवतात. स्वतःच्या अडचणी, दुःख किंवा भविष्यातील योजना ते सहसा इतरांशी सहजपणे शेअर करत नाहीत.

### प्रेमजीवन...

- जोडीदाराला कायम साथ देतात : प्रेमसंबंधांमध्ये हे लोक अत्यंत प्रामाणिक आणि निष्ठावान असतात. एकदा एखाद्यावर प्रेम जडले की, आयुष्यभर त्याची साथ निभावण्याचा प्रयत्न करतात. जोडीदाराची काळजी घेणे आणि प्रत्येक परिस्थितीत त्याच्या पाठीशी उभे राहणे हा त्यांचा स्वभाव असतो.
- मनाने प्रामाणिक : कधी-कधी त्यांचा स्वभाव अधिकार गाजवणारा वाटू शकतो; मात्र मनाने ते अत्यंत स्वच्छ आणि प्रामाणिक असतात. नातेसंबंधांमध्ये झालेल्या चुका ते मोठ्या मनाने माफ करण्याची वृत्ती ठेवतात.
- भावना कृतीतून व्यक्त करतात : हे लोक शब्दांपेक्षा कृतीवर अधिक विश्वास ठेवतात. त्यामुळे आपल्या भावना सतत व्यक्त करण्याऐवजी त्या कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे काही वेळा त्यांचा जोडीदार त्यांना अहंकारी किंवा अलिप्त समजू शकतो.



### करिअर

- व्यवसायात अधिक यशस्वी : नोकरीपेक्षा व्यवसाय क्षेत्र त्यांना अधिक अनुकूल ठरते. स्वतःचे नियोजन स्वतः करणे आणि स्वतंत्रपणे निर्णय घेणे त्यांना आवडत असल्याने उद्योजकतेकडे त्यांचा अधिक कल असतो. मेहनतीच्या जोरावर ते व्यवसायात चांगले यश मिळवू शकतात.
- स्वतःच्या पद्धतीने काम करण्याची आवड : या व्यक्तींमध्ये स्वाभिमानाची भावना प्रबळ असते. इतरांच्या आदेशानुसार किंवा कठोर नियमांच्या चौकटीत काम करणे त्यांना फारसे पसंत नसते. त्यामुळे स्वतःच्या कार्यपद्धतीनुसार काम करण्याकडे त्यांचा कल असतो.
- नोकरीत कोणती क्षेत्रे अनुकूल? : जर या व्यक्तींनी नोकरीचा मार्ग निवडला, तर व्यवस्थापन, प्रशासकीय सेवा, राजकारण, सरकारी विभाग तसेच नेतृत्वाची संधी असलेल्या क्षेत्रांमध्ये त्यांना चांगले यश मिळू शकते. आर्थिक स्थैर्याला ते नेहमी प्राधान्य देतात. त्यामुळे बचत करण्याची सवयही त्यांच्यात चांगली असते. कठोर परिश्रमाच्या जोरावर ते चांगली आर्थिक प्रगती करतात आणि समाजात मान-सन्मानही मिळवतात.
- टीप : ही माहिती अंकशास्त्र आणि पारंपरिक ज्योतिषीय मान्यतांवर आधारित आहे. याला वैज्ञानिक आधार उपलब्ध नाही. त्यामुळे या माहितीचा स्वीकार वैयक्तिक श्रद्धा आणि विश्वासाच्या आधारे करावा.

# स्वप्नात स्वत:ला लग्नाच्या कपड्यांत पाहणे शुभ की अशुभ?

## विवाहाशी संबंधित स्वप्नांकडे दुर्लक्ष करू नका; जाणून घ्या स्वप्नशास्त्रातील संकेत...



**स्वप्ने आपल्याला अनेकदा एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. काही स्वप्ने आपण दिवसभर विचार करत असलेल्या गोष्टींशी संबंधित असतात, तर काही पूर्णपणे अनपेक्षित असतात. स्वप्नशास्त्रानुसार, प्रत्येक स्वप्नामागे काही ना काही संकेत दडलेला असतो. जर तुम्ही अलीकडे स्वतःला वधू किंवा वराच्या पोशाखात, विवाहाची तयारी करताना किंवा विवाहाशी संबंधित इतर कोणतेही स्वप्न पाहिले असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. अशा स्वप्नांमधून शुभ-अशुभ संकेत मिळू शकतात, असे मानले जाते.**

ज्योतिषीय मान्यतांनुसार, स्वप्नात स्वतःला विवाहाच्या पोशाखात पाहणे हे शुभ मानले जाते. जर तुम्ही अविवाहित असाल, तर हे एखाद्या नवीन नात्याची सुरुवात होण्याचे किंवा एखाद्या विशेष व्यक्तीशी भेट होण्याचे संकेत असू शकतात. तसेच, हे स्वप्न आयुष्यात लवकरच एखादा सकारात्मक आणि महत्त्वाचा बदल घडणार असल्याचेही सूचित करते. जर स्वप्नात आपल्या घरात विवाहाची तयारी सुरू असल्याचे दिसले, तर ते शुभ संकेत मानले जातात. अशा स्वप्नाचा अर्थ असा लावला जातो की, येत्या काळात घरात एखादा मंगल किंवा आनंदाचा प्रसंग घडू शकतो. हा शुभ प्रसंग तुमच्याशी संबंधित असेलच असे नाही. तो कुटुंबातील बहीण, आत्या, मावशी किंवा इतर नातेवाईकांशी संबंधितही असू शकतो. त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असते.

### स्वप्नात स्वत:चा विवाह मोडताना पाहणे...

अशा प्रकारचे स्वप्न सावध राहण्याचा इशारा मानले जाते. विशेषतः विवाहित व्यक्तींनी असे स्वप्न पाहिल्यास, जीवनात काही अडथळे किंवा अनपेक्षित अडचणी येण्याची शक्यता असल्याचे मानले जाते. तसेच, नातेसंबंधांमध्ये तणाव वाढला असेल किंवा संबंध तुटण्याच्या टप्प्यावर असतील, तरी असे स्वप्न पडू शकते. काही मान्यतांनुसार, एखादी व्यक्ती तुमची फसवणूक करत असेल, तर तिचे खरे स्वरूप लवकरच समोर येण्याचाही हा संकेत असू शकतो.

### स्वप्नात विवाहाशी संबंधित वस्तू दिसणे

स्वप्नात सिंदूर, साडी, मेंदी, चुडा किंवा इतर विवाहाशी संबंधित वस्तू दिसणे हेही महत्त्वाचे मानले जाते. जर तुम्ही विवाहित असाल आणि वैवाहिक जीवनात काही अडचणी सुरू असतील, तर हे स्वप्न आध्यात्मिक साधना किंवा पूजाअर्चेकडे वळण्याचा संकेत मानले जाते. अशा वेळी माता पार्वतीला सौभाग्याचे साहित्य अर्पण करून भगवान शिव आणि माता पार्वतीची विधिपूर्वक पूजा करावी, तसेच सुखी आणि समृद्ध वैवाहिक जीवनासाठी प्रार्थना करावी, अशी पारंपरिक श्रद्धा आहे. स्वप्नशास्त्रानुसार, विवाहाशी संबंधित अशी स्वप्ने जीवनात येणाऱ्या अनेक शुभ बदलांचेही संकेत देऊ शकतात.





# स्वप्नात केस गळताना दिसतात?

## आर्थिक अडचणींसह कौटुंबिक समस्यांचे संकेत असू शकतात; जाणून घ्या स्वप्नशास्त्रातील अर्थ...

**आपल्याला पडणारी स्वप्ने भविष्यातील काही घटनांचे संकेत देत असतात, असे स्वप्नशास्त्रात मानले जाते. प्रत्येक स्वप्नाचा वेगळा अर्थ असतो. अनेकदा काही विचित्र स्वरूपाची स्वप्नेही पडतात. त्यापैकीच एक म्हणजे स्वप्नात केस गळताना दिसणे. असे स्वप्न आर्थिक, कौटुंबिक तसेच वैवाहिक जीवनाशी संबंधित काही संकेत देत असल्याचे ज्योतिषशास्त्रात सांगितले जाते.**

जसे वास्तवाचे एक जग आहे, तसेच स्वप्नांचेही स्वतंत्र जग आहे. स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्नांमधून भविष्यातील काही घटनांची पूर्वसूचना मिळू शकते. अनेकदा स्वप्नात अतिशय अनोख्या किंवा विचित्र गोष्टी दिसतात. उदाहरणार्थ, स्वतःचे केस हळूहळू गळताना दिसणे किंवा अचानक सर्व केस गळून पडल्याचे पाहणे. अशा प्रकारचे स्वप्न पडल्यास त्यामागील संकेत समजून घेणे आवश्यक मानले जाते.

- स्वप्नात केस गळण्याचा अर्थ काय? : ज्योतिषतज्ज्ञांच्या मते, स्वप्नात केस गळताना दिसणे हे कुंडलीतील शनी ग्रहाचा नकारात्मक प्रभाव वाढत असल्याचे संकेत मानले जातात. तसेच, शुक्र ग्रहाची प्रतिकूल स्थिती असल्याचेही हे स्वप्न सूचित करू शकते. याशिवाय, अशा प्रकारचे स्वप्न आर्थिक बाबतीत अधिक सावध राहण्याचा इशाराही देते. भविष्यात आर्थिक अडचणी किंवा अनपेक्षित खर्च उद्भवू शकतात, त्यामुळे आर्थिक निर्णय विचारपूर्वक घेण्याची गरज असल्याचे हे स्वप्न दर्शवते.



- असे स्वप्न वारंवार पडल्यास काय करावे? : ज्योतिषतज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची स्वप्ने पडत असतील तर आर्थिक व्यवहार अत्यंत सावधगिरीने करावेत. अनावश्यक खर्च टाळावा आणि गुंतवणुकीचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. तसेच, स्वप्नासोबतच प्रत्यक्ष आयुष्यातही केस गळण्याची समस्या असेल, तर गळलेले केस इकडे-तिकडे न टाकता एकत्र गोळा करून वाहत्या पाण्यात विसर्जित करावेत, असा पारंपरिक उपाय सांगितला जातो.
- वारंवार केस गळण्याचे स्वप्न पडल्यास... : जर हे स्वप्न वारंवार पडत असेल, तर ते घरातील मतभेद किंवा कौटुंबिक कलह वाढण्याची शक्यता दर्शवते. कुटुंबातील सदस्यांमध्ये एखाद्या कारणावरून वाद-विवाद किंवा तणाव निर्माण होण्याचे संकेतही यातून मिळू शकतात. याशिवाय, हे स्वप्न वैवाहिक जीवनात काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता दर्शवते. तसेच, एखादी मौल्यवान वस्तू हरवण्याची किंवा नुकसान होण्याची शक्यता असल्याचाही हा एक संकेत मानला जातो.

# कार्यालय नगरपरिषद, लोहा

ई-मेल mcloha18gmail.com | नांदेड | विभाग - बांधकाम
जा. क्र. ईनिविदा / ५५३/२०२६ | फो.क्र. (०२४६६) २४२५६२ | दि. ०२/०७/२०२६

## ई - निविदा सूचना २०२६-२७

लोहा नगरपरिषद तर्फे खालील विकासकामे करणेकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक अभियंता कंत्राटदार यांनी निविदा स्पर्धेत भाग घ्यावा.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामांची किंमत |
|---|---|---|
| ०१. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) महाभियान अंतर्गत गोविंद उंडाडे यांचे घर ते माधव पौळ यांच्या घरापर्यंत व लगतच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. (दुसरी वेळ) | २३९५७९१.०० |
| ०२. | स्थानिक आमदार विकास कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०६ मध्ये श्रीकृष्ण मंदिर जवळ सभागृह बांधकाम करणे. | ७७५५४१.०० |
| ०३. | स्थानिक आमदार विकास कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत नगरपरिषद लोहा हद्दीतील प्रभाग क्र. ०२ कल्याण मंडपम मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी सभागृह बांधकाम करणे. | १५६८५६९.०० |
| ०४. | सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत दत्ता काबळे पेंटर यांचे घर ते बिडईनगर पुलापर्यत नाली व रोड क्रॉसिंग बांधकाम करणे, | १९८६६८०.०० |
| ०५. | जिल्हा वार्षिक योजना मधील नागरी दलीतेत्तर योजना अंतर्गत प्रभाग क्र. ०६ मध्ये श्री. मोहन धोंडगे यांचे घर ते श्री. गोविंद जामगे यांच्या घरापर्यंत व लगतच्या परिसर मध्ये सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे. | १७०८७७८.०० |

उपरोक्त कामांच्या निविदा बाबत सविस्तर अटी व शर्ती आणि वेळापत्रक शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर दि. ०३.०७.२०२६ रोजी प्रसिद्धी देण्यात येत असून निविदे संदर्भातील सर्व सूचना / शुद्धिपत्रक याच संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात येतील.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद लोहा

स्वा/-
अध्यक्ष
नगरपरिषद लोहा

## टी.सी. हरवली

माझी अतुल चंद्रकांत लव्हेकर या नावाची दहावी पास ची टी.सी.हडको ते रेल्वेस्टेशन दरम्यान प्रवासात हरवली आहे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.
मोबाईल नंबर.
७४९८४४७३२

## टी.सी. हरवली

माझी गिरीष बालाजी बुरगुलवार या नावाची बारावी पासची टी.सी. मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.
**संपर्क पत्ता -**
**गिरीष बालाजी बुरगुलवार**
**रा. भावसार चौक, नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी बळीराम केशवराव पवार या नावाची गव्हर्मेंट पॉलिटेक्निक कॉलेज नांदेड येथील डिप्लोमा मूळ प्रत ही नांदेड ते निवघा प्रवास दरम्यान हरवलेले आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.
**संपर्क पत्ता:**
**बळीराम केशवराव पवार**
**रा. नांदेड ता.नांदेड जि.नांदेड**
**मोबाईल:- ९८५२२५५७७७**

## टी.सी. हरवली

मी देगलूर ते हणेगाव या बसने प्रवास करीत असताना माझी अमोल काशीराम पवार या नावाची बारावी पासची टी. सी. हरवली आहे. कृपया सापडल्यास पुढील पत्त्यावर कळवावे.
**संपर्क पत्ता -**
**अमोल काशीराम पवार**
**सेवादास नगर तांडा, हणेगाव**
**ता. देगलूर जि. नांदेड**

## E-Tender Notice

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

The Superintending Engineer, MSEDCL Hingoli Circle Hingoli on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed e-tenders from reputed and e-registered agencies/ bidders. The details are as given below.

| Sr. No. | Tender No. | Particulars of work | Tender Estimate Cost Rs in Lakhs | Tender Purchasing cost with GST | EMD in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | T-05/ 26-27 | e-Tender for Providing, transportation, loading, unloading, testing & fixing of 33kV & 11kV various type of CTs & PTs as per MSEDCL Specification at various 33kV Sub Station under Hingoli Circle | 20.00 | 2950/- | 20,000/- |
| 2 | T-06/ 26-27 | e-Tender work of Monthly Meter Reading of LT IP consumers Below 20 KW to be done using Mahavitaran Mobile App. Bill Printing and Bill distribution up to consumer premises under Hingoli Circle. | 30.00 | 2950/- | 30,000/- |
| 3 | T-07/ 26-27 RF | Tender for the work of Annual Maintenance/ Repairing of Office Computers & Printers in all Unit Offices, Sub-Division Offices & Circle Office under Hingoli Circle | 7.00 | 1180/- | 7,000/- |

The tenders will be processed only in electronic tendering mode and opened for registered agencies on e-Tendering system for works contract of MSEDCL. The Bid documents will be available from 03.07.2026 to 08.07.2026 up to 16.00 PM. The last date of uploading of e-Tendering is 08.07.2026 upto 16.00 PM. Pre bid meeting will be held on date 06.07.2026 at 11.00 Hrs. For more details regarding registration process and tender visit our Company's e-Tendering website https://www.mahadiscom.in.

The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof. Contact Details : Bharat Vhanmane, I/c Executive Engineer(Admn) Contact No.: + 91 7875764507.

Sd/-
**PR No. 37/2026-27 Dt. 01.07.2026** **Superintending Engineer, MSEDCL Hingoli Circle**

## VEHICL FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech No. | Year | Model |
|---|---|---|
| MH-38-AD-3401 | 2023 | RENAULT-TRIBER |

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before 09/07/2026 Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601
8108157969, 8108151742

## टी.सी. हरवली

माझी शेख खाजा मस्तानशहा या नावाची दहावी पासची टी. सी. नांदेड ते रहाटी बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.
**संपर्क पत्ता -**
**रहाटी बु. ता.जि. नांदेड**

## Change In Name

My old name is **SHAZIYA FIRDOSE MIRZA ANWAR BAIG** which now I am changing as New name **SHAZIYA FIRDOS AMJAD KHAN** hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Shaziya Firdos Amjad Khan
Sugra Manzil, Plot No. 12,Galli No.16, Millat Nagar Near Water Tank-Nanded, Tq & Dist. Nanded.
Pin Code:431604 Contact No. 9860008064

## Change In Name

My old name is **MAIMOONA BEGUM** which now I am changing as New name **MAIMUNA BEGUM SHAIKH AHMED** hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address -
Bhayagoan Road, Ekta Nagar, Degloor, Nanded 431717
Mo.No. 9970834195

## टी.सी. हरवली

माझी श्रेया राजेश जाधव रा. खैरगाव ता.नायगाव जि.नांदेड या नावाची तीसरी (३), पासची टी. सी. नायगाव ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.
**संपर्क पत्ता -**
**श्रेया राजेश जाधव खैरगाव**
**ता.नायगाव खै. जि. नांदेड**
**मो. १७५४३९२२२**

## घरातुन निघून गेला आहे



उमरी - माझे वडील नामे पिराजी बुधाजी चव्हाण राहणार तळेगाव ता. उमरी, ह्ल्ली मुक्काम वाडी रोड उमरी. ता. उमरी, जि. नांदेड , वय ७६ वर्षे हे १३-७-२००८ पासून घरातून निघून गेले आहेत. आजवर आम्ही त्यांचा शोध घेतला. मात्र ते कुठेच सापडले नाहीत. स्वतःहून घरी परत येतील. म्हणून वाट पाहिली. आज पर्यंत ते परत घरी आले नाहीत. सावळा वर्ण असून धोती , कमीज शर्ट व डोक्याला साधा फेटा असा त्यांचा नेहमीचा पेहराव आहे. त्यांना मराठी व काही प्रमाणात हिंदी भाषा बोलता येते. ते निरक्षर असून त्यांना लिहिता वाचता येत नाही. सदरील वर्णनाची व्यक्ती कुणाला आढळल्यास कृपया खालील पत्त्यावर किंवा उमरी, जिल्हा नांदेड (महाराष्ट्र) येथील पोलीस स्टेशनला माहिती द्यावी.

**दत्ता पिराजी चव्हाण**
**मु. पो. वाडी रोड, उमरी. (रेल्वे स्टेशन)**
**ता. उमरी , जिल्हा नांदेड.**
**मो. नं. ९४२३६५७२११**

## Change In Name

My Old Name is **PATIL MANOHAR MAROTRAO** which now I am changing as New Name **PATIL MANOHAR MAROTIRAO** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - At.Po. Kasrali, Matha Galli, Kasrali, Tq. Biloli Dist. Nanded 431710**
**Mo.No. 9766075681**

## Change In Name

My Old Name is **SAEEDA NAGMA BEGUM MOHAMMAD ABDUL MAROOF** which now I am Changing as New Name **SAEEDA NAGMA BEGUM.** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address: 9-7-292/5, Hyder Bagh, 2nd Floor, Naka, Nanded, Maharashtra – 431604.
Mo.No. 7020638174

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD ABDUL MAROOF MOHAMMAD ABDUL MUBEEN** which now I am Changing as New Name **MOHAMMAD ABDUL MAROOF.** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address: 9-7-292/5, Hyder Bagh, 2nd Floor, Naka, Nanded, Maharashtra – 431604.
Mo.No. 8179717760

## पाहिजेत

**मोमीन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित**

## इस्लाहुल अमल गर्ल्स हायस्कुल सय्यदान नांदेड

इस्लाहुल अमल गर्ल्स हायस्कुल सय्यदान नांदेडमध्ये बि. एस्सी., बि. एड. (विज्ञान विषय) शिक्षण सेवकाची एक पद अनुदान तत्वावर भरणे आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी (बि. एस्सी., बि. एड.) मुळ शैक्षणिक प्रमाणपत्र व साक्षांकीत प्रतीसह स्वतः खर्चाने दिनांक ०५-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता शाळेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

**स्वाक्षरीत/-**
**सेक्रेटरी**
**इस्लाहुल अमल गर्ल्स**
**हायस्कुल सय्यदान नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## टी.सी. हरवली

माझी राहुल चंद्रकांत लव्हेकर या नावाची दहावी पास ची टि. सी.हडको ते रेल्वेस्टेशन दरम्यान प्रवासात हरवली आहे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.
**मोबाईल नंबर -९८२०७ ४४८६६**

## टी.सी. हरवली

माझी मितुल चंद्रकांत लव्हेकर या नावाची दहावी पास ची टि. सी. हडको ते रेल्वेस्टेशन दरम्यान प्रवासात हरवली आहे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.
**संपर्क मोबाईल संपर्क नंबर ९९६७५५१३४४**

## टी.सी. हरवली

माझी संजीवनी बळीराम पवार इयत्ता दहावी पासची टी सी नांदेड ते लोहा प्रवास करताना टीसी हरवलेली आहे सापडून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल
संपर्क
बळीराम भिमराव पवार
९०६७८९६०२१

## टी.सी. हरवली

माझी ऋतुजा रमेश कौटीकवार या नावाची बारावी पास विज्ञान शाखा पास व इतर कागदपत्रे मुखेड ते नांदेड प्रवासा दरम्यान हरवले आहेत, कुणाला सापडल्यास खाली पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती
संपर्क पत्ता.-
ऋतुजा रमेश कौटीकवारवार
दीपनगर मुखेड, ता.मुखेड जि नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०८/२०२६
(CNR No.MHND10007612026)

अर्जदार - १ सविता नरहरी संगेवार वय - ८५ वर्षे, धंदा-घरकाम, २ पुरुषोत्तम नरहरी संगेवार वय - ६६ वर्षे धंदा-पेन्शनर, ३ उमाकांत पि. नरहरी संगेवार वय - ६२ वर्षे धंदा-पेन्शनर, अर्जदार क्र. १ ते ३ रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड ४. अनुसया किशोर नोमुलवार रा. नांदेड जि. नांदेड वय - ५४ वर्षे, ५ रेणुका सुर्यकुमार यन्नावार, रा. सिडको नांदेड ता. जि नांदेड वय - ५२ वर्षे धंदा - घरकाम, ६. ओमप्रकाश नरहरी संगेवार वय-५५ वर्षे, धंदा - व्यापार, ७. प्रशांत नरहरी संगेवार अर्जदार क्र. ६ ते ७ रा. कंधार ता. कंधार, जि. नांदेड, वय - ५३ वर्षे, धंदा - नौकरी.

विरुध्द

गैरअर्जदार-निरंक

प्रकरण- अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील नामे नरहरी मारोती संगेवार हे होते. ते दिनांक ०९/०३/२०२६ रोजी कंधार ता. कंधार येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, नरहरी मारोती संगेवार यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख -२४/०७/२०२६. आज रोजी दि. २३/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, कंधार

## जाहीर प्रगटन

मा. आर. पी. शिंदे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ६२४/२०२६
विलास व ईतर वि. निरंक ने,ता, ३०/०७/२०२६.

अर्जदार:-१ विलास पि. रंगराव देशमुख, वय ५६ वर्षे, व्यवसाय -व्यापार, २. सुनिल पि. रंगराव देशमुख, वय ५२ वर्षे, व्यवसाय - व्यापार दोघे रा. सिध्दार्थ नगर, सांगवी बु., नांदेड ता. जि. नांदेड ३. सौ. कल्पना भ्र. प्रताप कदम, वय ५० वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. बारड, शेवाळा ता. हदगाव जि. नांदेड, ४. चंद्रकांत पि. रंगराव देशमुख, वय ४८ वर्षे, व्यवसाय-व्यापार रा. सिध्दार्थ नगर, सांगवी बु., नांदेड, ता. जि. नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार: शाखा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा श्रीनगर कॉलनी, नांदेड

दावा:- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रंगराव किशनराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक १०/०७/२०१७ व मयत गोदावरीबाई भ्र. रंगराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक ०६/०६/२०१५ रोजी नांदेड, ता.जि. नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १, २ व ४ ही मयतांची मुले असून, अर्जदार क्र. ३ ही मयतांची मुलगी आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयताच्या वारसदार आहेत असे नमूद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत रंगराव किशनराव देशमुख यांनी त्यांच्या हयातीत गैरअर्जदार यांच्याकडे खाते काढले होते. सदरील खाते क्र. ५२०७२५८९१४२ असून सदर खात्यावर रुपये ८५,०००/- शिल्लक आहेत. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

क. लिपिक | सहा.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय,क, स्तर, नांदेड

## Change In Name

My old spouse name is **KHAJA KHAN MEHTAB KHAN** which now I am changing as New spouse name **FARHANA YASMEEN SHOEB AMHAD KHAN** hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address - Plot No. 27/A, Gat No. 169, Opp. Danish function hall, Nanded 431605
Mo.No. 8857973045

## 1 BHK Flat किरायाने देणे आहे

प्रशस्त, सर्व सोयीने युक्त, सिलिंग, सेमी फर्निचर, सीसीटीव्ही कव्हरेज, पाण्याची २४ तास उपलब्धता. सुमित्रा पेट्रोल पंपाच्या अगदी जवळ, **1BHK** फ्लॅट किरायाने देणे आहे.
पत्ता- राम सेतू पुलाजवळ, रामेश्वर मंदिराच्या बाजूला, विजय नगर शिक्षक कॉलनी, जुना कौठा, नांदेड - ४३१६०३
**Contact Number**
**9403854442, 8208778403**

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## गुटखा विक्री तसेच जुगार खेळणाऱ्या १७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल; २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यावर आळा घालण्यासाठी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने कारवाई करीत अवैध जुगार खेळणारे, सिगारेट अणि इतर तंबाखू उत्पादने बाळगणाऱ्यांवर कारवाई केली. यावेळी १७ जणांवर पाच गुन्हे दाखल करून जवळपास दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

३० जून रोजी नांदेड ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आहिल्याबाई चौक आगन हॉटेलच्या बाजूला ठाकूर पान शॉप येथे जाऊन पान शॉपची तपासणी केली असता सदर पान शॉपमध्ये प्रतिबंधीत केलेला गुटखा व पान मसाला पुड्या मिळून आल्याने आरोपी विक्रमसिंह व बद्रिसिंह ठाकूर (वय ३६ वर्षे, व्यवसाय पान शॉप रा. नरोबा मंदिर जवळ कौठा नांदेड) याच्याविरुद्ध पो. स्टे. नांदेड ग्रामीण गु.र.न. ८०३/२०२६, कलम ५, ७ सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य विनयमन) अधिनियम २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करून कोप्टा कारवाईमध्ये १ हजार २८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



तसेच चार वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करून तिर्रट नावाचा जुगार खेळणारे आरोपी गौतम हिरामण वाठोरे (वय ४३ वर्षे रा. हडको नांदेड), राजीव बसवंते रा. रूंज ता. वसमत, जि. हिंगोली, प्रभाकर सदाशिव मारतळे (वय ४७ वर्षे रा. बळीरामपूर नांदेड), एकनाथ व्यंकटराव रायपतवार (वय ५२ वर्षे रा. सिडको नांदेड), संभाजी सिकंदर भोकरे (वय ३३), राहुल हरी गायकवाड (वय ४३ वर्षे), रवी नरहरी जाधव (वय ४५), वामन हरी गायकवाड, गजानन भगवान सूर्यवंशी सर्व रा. जुना कौठा नांदेड, राजेश उमाजी गोडबोले वय ३१, हिराचंद भानुदास भोकरे वय ३५, किरण भोकरे आणि सुनिल भोकरे सर्व रा. जुना कौठा नांदेड व ईतर अनोळखी ३ हे लातूर फाट्याजवळ मोकळ्या जागेत जुना कौठा रोडच्या बाजूला, उत्थाननगर येथे तिर्रट नावाचा जुगार खेळत असताना मिळून आले. या आरोपीतांविरुद्ध पो. स्टे. नांदेड ग्रामीण येथे गु. र. नं. ७९९/२०२६, गु. र. नं. ८००/२०२६, गु.र.न.८०१/२०२६, गु. र. न.८०२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे ४ गुन्हे व सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने अधिनियमप्रमाणे १७ जणांविरुद्ध ५ गुन्हे दाखल करून एकूण १ लाख ९७ हजार १८५ रुपयांचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्य जप्त केले.

## 'एचएसआरपी' नंबर प्लेट तत्काळ बसवा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी भारत सरकारच्या मोटार वाहन नियमांनुसार सर्व पात्र वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.

ज्या वाहनधारकांनी अद्याप त्यांच्या वाहनावर 'एचएसआरपी' नंबर प्लेट बसविलेली नाही त्यांनी ती तत्काळ अधिकृत केंद्रावरून बसवून घ्यावी. शासनाने दिलेली मुदत संपल्यानंतर दि. १ जुलै २०२६ पासून 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत असून नियमानुसार दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे.

'एचएसआरपी'नंबर प्लेटमुळे वाहनांची ओळख अचूकपणे पटते, वाहन चोरीस प्रतिबंध होण्यास मदत होते. तसेच बनावट नंबर प्लेटचा गैरवापर रोखण्यास सहाय्य होते. त्यामुळे प्रत्येक वाहनधारकाने ही बाब गांभीर्याने घ्यावी, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

## गांजा तस्कर जेरबंद, एक किलो गांजासह १ लाख ६० हजारांच्या नशेच्या गोळ्या जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक गुन्हा शाखेने कारवाई करत १ किलो ४० ग्रॅम गांजा (अमली पदार्थ) पकडून तेलंगणातील एका युवकावर कारवाई केली. या प्रकरणी इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

याच गुन्ह्याच्या तपासात इतवारा पोलिसांनी कारवाईला पुढे घेऊन जात आणखी ३८ हजार ५५० रुपयांचा गांजा तर १ लाख ६० हजार पाचशे रुपयांच्या प्रिगालॅब अर्थात नशेच्या गोळ्या जप्त लेल्या आहेत. या कारवाईत एक तलवार सापडली असून इतवारा पोलिसांनी दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात विनोद जोंधळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून मुख्य आरोपी असलेली पूजा जोंधळे अद्यापही पोलिसांच्या हाती लागली नांही.

जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्याविरुद्धच्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हा शाखेने २९ जून रोजी जुन्या नांदेडातील देगलूर



नाका पशुवैद्यकीय दवाखान्याच्या मोकळ्या जागेत गांजाची विक्री करीत असलेल्या मोहम्मद अमीर मोहम्मद इस्माईल या बोधन तालुक्यातील युवकाला पकडून त्याच्याकडून १ किलो ४० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला होता. या कारवाईत ५२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हा गांजा त्याने शांतीनगर येथील पूजा जोंधळे या महिलेकडून खरेदी केला असल्याचे सांगितले होते.

या प्रकरणाच्या तपासात इतवारा पोलीस ठाण्याचे तपासीक अधिकारी पोलीस उपनिरीक्षक देशमुख हे आरोपी पूजा जोंधळे या महिलेचा शोध घेण्यासाठी तिच्या घरी गेले असता तेथे ती आढळून आली नाही. घराची झडती घेतली असता तेथे असलेला विनोद जोंधळे हा एका गोणीवर संशयास्पद बसलेला आढळून आला. त्या संशयावरून ती गोणी तपासली असता त्यामध्ये ६ हजार ५०० प्रिगालॅब या नशेच्या गोळ्या आढळल्या. तसेच ७७१ ग्राम गांजाही सापडला आहे. या घरातून एक तलवार आणि वजन काटा आढळून आला आहे.

या कारवाईत २ लाख ५० हजार रुपयांचा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात विनोद जोंधळेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पूजा जोंधळेचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## अवैध व्यवसाय अंतर्गत ३७ जणांविरुद्ध कारवाई; २० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उप-महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले असून, याबाबतच्या सविस्तर सूचना दिनांक ३० जून रोजी परिक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

या मोहिमेच्या पहिल्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात गांजा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध एनडीपीएस कायद्याखाली ४ इसमांविरुध्द कारवाई करुन त्यांचेकडून ७ लाख ५९ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा विक्री करणाऱ्या एका इसमाकडून रुपये १ लाख १३ हजार ४०० रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ७ इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांचेविरुद्ध ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५१ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या १८ आरोपींविरुद्ध १८ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ९० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाई सोबतच, शस्त्र अधिनियमान्वये १ अग्निशस्त्र व कोटपा अन्वये २ तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण २९ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून २० लाख ६० हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे सक्तीची करा -आ. श्रीजया चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील बहुतांश माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृहांची वानवा असून, प्रत्येक शाळेत ही व्यवस्था अनिवार्य करण्याची आग्रही मागणी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी आज विधानसभेत केली.



या महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. यावेळी त्या म्हणाल्या की, राज्यात सुमारे ३० हजार माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहेत. मात्र यांपैकी बहुतांश ठिकाणी मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची कोणतीही ठोस व्यवस्था नाही. जानेवारी २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आरोग्याचा अधिकार हा मूलभूत हक्काचाच एक भाग असल्याचा निर्वाळा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना त्यांच्या मासिक पाळीच्या दिवसांकरिता मोफत 'बायो-डिग्रेडेबल' सॅनेटरी नॅपकिन्स मिळणे, तसेच प्रत्येक शाळेत मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

परंतु राज्यभरातील शाळांच्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकताना आमदार श्रीजया चव्हाण पुढे म्हणाल्या की, काही शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांची व्यवस्था असली तरी ती बहुतांश वेळा अंधारलेली, असुरक्षित आणि वापरण्यायोग्य नसते. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांमध्ये या स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. स्वच्छतागृहांच्या दुर्दशेमुळे आणि असुरक्षिततेमुळे अनेक मुली शाळेत जाणे टाळतात. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत मोठा अडथळा निर्माण होत आहे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. मुलींना सन्मानजनक, आरोग्यदायी आणि सुरक्षित जीवन जगण्याचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे त्यांच्या या हक्काची पायमल्ली थांबवण्यासाठी राज्यातील प्रत्येक शाळेत मुलींसाठी आरोग्यदायी, स्वतंत्र, सुरक्षित आणि योग्य सुविधा असलेल्या शौचालयांची व्यवस्था सक्तीची करावी, अशी मागणी भोकरच्या भारतीय जनता पार्टीच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी केली.

## नांदेड दक्षिणच्या विकासासाठी भरीव निधी देण्याची आ. बोंढारकर यांची पावसाळी अधिवेशनात मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शहरासह ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार आनंदराव पाटील तिडके-बोंढारकर यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केली.



अधिवेशनाच्या काळात आ. बोंढारकर यांनी मतदारसंघातील विविध विकासकामांसह रोजगार हमी योजनेशी संबंधित अनेक प्रश्न सभागृहात उपस्थित केले. रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत रोजगार सेवकांच्या मानधनवाढीचा मुद्दा त्यांनी ठळकपणे मांडला. तसेच कुशल व अकुशल कामगारांच्या निधीचे वितरण तातडीने सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. या प्रश्नांवर उत्तर देताना रोजगार हमी योजनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सकारात्मक भूमिका घेत, योजनेशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही सभागृहात दिली.

यावेळी आ. बोंढारकर यांनी नांदेड शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार अपुऱ्या पडणाऱ्या मूलभूत सुविधांकडे सरकारचे लक्ष वेधले. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, नागरी सुविधा आणि ग्रामीण भागातील विकासकामांसाठी तातडीने विशेष निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण कायापालट करण्यासाठी आवश्यक निधी तातडीने मंजूर करून विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी आ. बोंढारकर यांनी सभागृहात केली.

## नंदकुमार कोसबतवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड



वाघाळा मनपाचे माजी नगरसेवक, स्थायी समितीचे माजी सभापती, ओबीसी चळ-वळीतील अग्रणी नेते, अखिल भारतीय संत नामदेव महाराज संघटनेचे राज्य नेते नंदकुमार पोशट्टी कोसबतवार यांचे अल्पशा आजाराने गुरुवार, दि. २ जुलै रोजी सकाळी निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा ३ जुलै रोजी स. ९ वा. राहते घर के. लक्ष्मीसदन हनुमान मंदिराजवळ शिवाजीनगर नांदेड येथून निघणार आहे. त्यांच्या पार्थिवावर शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## टीईटी आणि नीट पेपर फुटीच्या विरोधात 'डीवायएफआय'ची निदर्शने

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आणि नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनेच्या निषेधार्थ आणि राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी २ जुलै रोजी 'डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया'च्या वतीने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

२८ जून रोजी घेण्यात येणारी टीईटी परीक्षा पूर्वीच म्हणजेच २७ जून रोजीच पेपर फुटल्याची धक्कादायक घटना समोर आली. देशात नुकतेच गाजलेल्या 'नीट' परीक्षा घोटाळ्याचे प्रकरण ताजे असतानाच आता महाराष्ट्रातही पेपर फुटल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी, बेरोजगार युवक-युवती आणि त्यांच्या कुटुंबामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.




शासनाकडून वारंवार कडक कायदे आणि उपाययोजनांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात पेपरफुटीचे प्रकार रोखण्यात सरकारला सातत्याने अपयश येत आहे. यामुळे स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवरील विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास पूर्णपणे डळमळीत झाला असून, तरुणांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या गंभीर घटनेची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री दादा भुसे आणि धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी या आंदोलनादरम्यान करण्यात आली. राज्यातील व देशातील पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून यामागील संपूर्ण रॅकेट उघडकीस आणण्यात यावे, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या आणि या गैरप्रकारात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना तत्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी, बेरोजगार तरुण व विद्यार्थ्यांना झालेल्या मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसानीची दखल घेऊन शासनाने योग्य उपाययोजना कराव्यात यासह अन्य मागण्यांसाठी दोषींवर तत्काळ कारवाई करावी अन्यथा विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा डीवायएफच्या वतीने देण्यात आला आहे. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष स्टॅलिन आडे, जिल्हा सचिव इरफान पठाण आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या आंदोलनास सीटू जनरल सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड यांनी पाठिंबा दिला.

## 'केसीसी'च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्कार




**नांदेड (प्रतिनिधी) –** दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांचे डॉक्टर व इंजिनिअर बनण्याचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या कोनाळे कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार गुरुवार दि. २ जुलै रोजी उत्साहात पार पडला.

### शेतकरी कुटुंबातील मुलांचे यश अविस्मरणीय - प्रा. कोनाळे

नीट, आयआयटी व इंजिनिअरींग कॉलेजमध्ये कोनाळे कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा सातत्याने वाढणारा टक्का हे आमच्या टिमचे यश आहे. आजचे बहुतांश गुणवंत विद्यार्थी हे ग्रामीण भागाच्या शेतकरी कुटुंबातील आहेत. आयआयटीचा अर्थही माहिती नसलेल्या परिवारातील मुलं केसीसीत तयार झाल्याचे समाधान शब्दात व्यक्त करु शकत नाही.

कोनाळे कोचिंग क्लासेसचे संस्थापक प्रा. व्ही. डी. कोनाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, तानाजी भोसले, शिवाजीराजे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शालेय स्तरावरील स्कॉलरशिप परीक्षेतील २६, डॉ. होमी भाभा अंतिम परीक्षेतील २४, एमएचटी सीईटीतील ९७ पर्सेंटाईलपेक्षा अधिक गुण घेणारे ८९ तर आयआयटीत प्रवेशित झालेल्या ३३ गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दत्तात्रय बिरादार यांनी तर सूत्रसंचालन संतोष पतंगे यांनी केले.

### कोनाळे कोचिंग क्लासेसमुळे नांदेडचे नाव सातासमुद्रापार : डॉ. गोविंद नांदेडे

कोनाळे कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गोविंद नांदेडे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याची तळमळ असणारे शिक्षक लाभणे हे हल्ली सर्वात मोठे भाग्य म्हणावे लागते. प्रा. व्ही. डी. कोनाळे व त्यांच्या टिममुळे हजारो डॉक्टर व इंजिनिअर देश-विदेशात सेवा बजावत आहेत. नांदेडचे नाव सातासमुद्रापार नेण्यात कोनाळे कोचिंग क्लासेसचा सिंहाचा वाटा आहे.

### तुम्ही भविष्याचे राष्ट्रनिर्माते बनावे : शिवाजीराजे पाटील

कोनाळे कोचिंग क्लासेसने गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. केसीसीतून बाहेर पडणारे सर्व विद्यार्थी भविष्यात राष्ट्रनिर्माणातही अग्रेसर राहतील हे संस्कार त्यांच्यावर करण्यात आई-वडिलांसह कोनाळे कोचिंग क्लासेसचा वाटा असल्याने आम्हा सर्वांना आनंद आहे, असे शिवाजीराजे पाटील म्हणाले.

## किनवट बाजार समितीतील गैरव्यवहाराच्या चौकशीची मागणी

**किनवट (प्रतिनिधी)–**किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील आर्थिक गैरव्यवहारांवरून सत्ताधारी व माजी पदाधिकाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. एका बाजूला विद्यमान सभापती गजानन मुंडे यांनी दि. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीतील सर्व आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर व्यवहारांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी व विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी केली आहे, तर दुसरीकडे सेवानिवृत्त सचिव रवी तिरमनवार यांनी ही मागणी फेटाळून लावत, सध्या चर्चेत असलेल्या १.७३ कोटी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप सभापतींवर केला आहे.

काही दिवसांपूर्वी बाजार समितीचे उपसभापती व संचालकांनी विद्यमान सभापती गजानन मुंडे व सचिव राठोड यांनी संगनमताने सुमारे १.७३ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार जिल्हा



निबंधकांसह संबंधितांकडे केली होती. त्यानंतर याच कारणावरून सभापती मुंडे यांच्याविरोधात संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. परंतु सभापती मुंडे यांनी न्यायालयात धाव घेऊन स्थगिती मिळवली. त्यानंतर आरोप-प्रत्यारोपांच्या 'आवकी'नंतर सभापती मुंडे यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्याकडे माजी संचालक मंडळाच्या गैरकारभाराचा पाढाच वाचला.

या संदर्भात दिलेल्या तक्रार अर्जात त्यांनी नमूद केले आहे की, तत्कालीन सभापती, सचिव, संचालक मंडळ व अधिकाऱ्यांनी संगनमताने सार्वजनिक निधीचा अपहार केला, बनावट बिले, बाजार शुल्कातील अनियमितता, नियमबाह्य कर्मचारी भरती तसेच गोकुंदा येथील जमीन, जुनी कार्यालयीन इमारत व गोदाम विक्री प्रक्रियेत मंजुरीच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. संबंधित कालावधीतील सर्व आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण करून दोषींवर दिवाणी, फौजदारी व विभागीय कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**आरोप निराधार – तिरमनवार**

विद्यमान सभापती गजानन मुंडे यांनी लावलेले आरोप निराधार असल्याचे स्पष्टीकरण सेवानिवृत्त सचिव रवी तिरमनवार यांनी केले आहे. साल २०१७ ते २०२२ या कालावधीतील सर्व व्यवहार सक्षम प्राधिकरणांच्या मंजुरीने झाले असून, नियमित लेखापरीक्षणात कोणतीही आर्थिक अनियमितता आढळलेली नसल्याचा दावा त्यांनी केला.

तिरमनवार यांनी सांगितले की, बाजार समितीतील कथित १.७३ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार व सोयाबीन खरेदी प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेतली असून पणन संचालकांच्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधकांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

### 'त्या' चौकशीचा अहवाल लवकरच - सहायक निबंधक

किनवट बाजार समितीच्या विद्यमान सभापती व सचिवांनी १.७३ कोटींचा गैरव्यवहार केल्याची तक्रार उपसभापतींसह संचालकांनी जिल्हा निबंधकांकडे केली होती. त्या तक्रारीची दखल घेत जिल्हा निबंधकांनी चौकशी समिती नेमली आहे. सदर समिती त्या संदर्भातला अहवाल महिनाभरात सादर करेल, अशी माहिती किनवट येथील सहायक निबंधक दीपक गायकवाड यांनी दिली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com